रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ९१
www.ramprahar.com

◆ रविवार, १८ ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

तळोजा ड्रग्ज प्रकरणाचे दिवा-मुंब्रा कनेक्शन/२
'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४
राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत रायगडची चमक/८

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना डी.लिट. पदवी प्रदान



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सावंगी मेघे (वर्धा) येथील अदानी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (एआयएचईआर) या अभिमत विद्यापीठाच्या १७व्या दीक्षांत समारंभात मानद डी. लिट. पदवी प्रदान करण्यात आली. विद्यापीठाच्या नावात बदल झाल्यानंतरचा हा पहिलाच दीक्षांत समारंभ होता. एआयएचईआरच्या कुलपती आणि अदानी फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. प्रीती अदानी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभाला राज्यमंत्री डॉ. पंकज राजेश भोयर यांची विशेष उपस्थिती होती. या सोहळ्यात राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे (एनएमसी) अध्यक्ष डॉ. अभिजात शेठ यांनाही वैद्यकीय शिक्षण, आरोग्य व्यवस्थापन आणि सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील योगदानाबद्दल मानद 'डॉक्टर ऑफ सायन्स' (डी.एस्सी.) पदवीने गौरविण्यात आले.

# कर्करुग्णांना मोठा दिलासा

## महागडी चाचणी आता जनआरोग्य योजनेत उपलब्ध

**मुंबई : प्रतिनिधी**

कर्करोगाचे अचूक निदान, आजाराचा टप्पा निश्चित करणे आणि उपचारांचा परिणाम तपासण्यासाठी महत्त्वाची असलेली पीईटी–सीटी स्कॅन ही महागडी तपासणी आता महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे तसेच निवडक १३ प्रकारच्या कर्करोगांसाठी पीईटी–सीटीचा स्वतंत्र अथवा नियमित प्राथमिक निदान प्रक्रिया म्हणून समावेश केला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने त्याबाबतचा शासन निर्णय जारी केला असून त्यानुसार ६३ कर्करोग उपचारांचा पॅकेजमध्ये पीईटी–सीटी तपासणीचा 'अतिरिक्त निदान प्रक्रिया' म्हणून समावेश केला आहे तसेच १३ प्रकारच्या कर्करोग उपचारांसाठी 'स्वतंत्र निदान प्रक्रिया' म्हणून या तपासणीला मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे कॅन्सर रुग्णांना स्वतःच्या खिशातून महागड्या तपासणीसाठी खर्च करण्याचा भार कमी होणार आहे.



अनेकदा रुग्ण महागड्या तपासणी खर्चामुळे पीईटी–सीटी तपासणी पुढे ढकलत किंवा तपासणी टाळतात. परिणामी आजाराचे स्वरूप समजण्यास आणि योग्यवेळी उपचारांचे नियोजन करण्यास विलंब होतो. ही अडचण लक्षात घेऊन पीईटी–सीटी तपासणीचा योजनेत समावेश करण्याची मागणी नागरिक व संलग्न रुग्णालयांकडून होत होती. या मागणीच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या सूचनेनुसार स्वतंत्र अभ्यास समिती स्थापन केली होती. या समितीने केलेल्या शिफारशींचा विचार करून शासनाने हा निर्णय घेतला आहे. यामुळे कर्करोगावरील उपचार अधिक सुलभ, योग्यवेळी होतील तसेच रुग्णांना महागड्या तपासणीसाठी खर्च करण्याचा आर्थिक भार कमी होण्यास मदत होईल.

### ६३ उपचारांचा समावेश

कर्करोग उपचारांशी संबंधित ६३ उपचार पॅकेजमध्ये पीईटी–सीटी स्कॅनचा अतिरिक्त निदान प्रक्रिया म्हणून समावेश करण्यात आला आहे. यापूर्वी ४४ उपचार पॅकेजमध्ये ही सुविधा समाविष्ट होती. नव्या निर्णयामुळे अशा अतिरिक्त पॅकेजची संख्या वाढविण्यात आली आहे.

### १३ उपचारांना मान्यता

याशिवाय वैद्यकीयदृष्ट्या उपयुक्तता निश्चित झालेल्या निवडक १३ प्रकारच्या कर्करोग उपचारांसाठी पीईटी–सीटी स्कॅन स्वतंत्र किंवा नियमित निदान प्रक्रिया म्हणून समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# एसआयआर फक्त निमित्त, खरा विरोध लोकशाहीला!

## मुख्यमंत्री फडणवीसांची विरोधकांवर टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

देशात अराजकता माजवून सत्ता मिळवण्याचा त्यांचा डाव अखेर उघड झाला. एसआयआरला विरोध हे फक्त निमित्त आहे, खरा विरोध लोकशाहीला आहे, असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा विरोधकांवर जोरदार टीकास्त्र सोडले.

केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घ्यावा, एसआयआर प्रक्रिया रद्द करावी, या मागणीसाठी काँग्रेस, कॉक्रोच जनता पार्टी, डाव्या संघटना आणि इंडिया आघाडीतील घटक पक्षांचे आंदोलन सुरू आहे. विरोधकांची भूमिका जाहीर करण्याकरिता घेतलेल्या पत्रकार परिषदेत प्रशांत भूषण यांनी रेजीम चेंज हा शब्द वापरला होता. सत्ता उलथवून लावण्यासाठी हे आंदोलन सुरू असल्याचे त्यांनी म्हटले. यावरून सत्ताधाऱ्यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला. आता पुन्हा एकदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवर एक पोस्ट शेअर करत विरोधकांवर निशाणा साधला आहे.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले की, लोकशाही मार्गाने पात्र मतदारांच्या मताच्या माध्यमातून निवडून येण्याची शक्यता दूरदूरपर्यंत दिसत नसल्याने त्यांच्या तोंडून ते 'सत्य' बाहेर आले. देशात अराजकता माजवून सत्ता मिळवण्याचा त्यांचा डाव अखेर उघड झाला. त्यांना एसआयआर का नकोय? कारण त्यांना 'रेजीम' बदलायचीय. निवडणुकीच्या माध्यमातून सत्तेवर येण्याची शक्यता नसल्यामुळेच 'रेजीम' बदलण्याची भाषा! सत्ता उलथून टाकायचीय, पण लोकशाही मार्गाने नव्हे! एसआयआरला विरोध हे फक्त निमित्त. खरा विरोध आहे तो लोकशाहीला. खरा विरोध आहे तुमच्या आमच्या पात्र मतांना.

आता आपल्याला ठरवायचंय, लोकशाही हवी की 'रेजीम' बदलण्याची भाषा करणारे? लोकशाहीसाठी एसआयआरशिवाय पर्याय नाहीच, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केले आहे.



पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी न्हावेखाडी उत्तरपाडा येथे जाऊन ठाकूर कुटुंबीयांच्या कुलदैवतांचे दर्शन घेतले. यावेळी मदन ठाकूर, सी.एल. ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, शिवाजी ठाकूर, विजय ठाकूर उपस्थित होते.

## कोल्हापूर, सांगली, नाशिकमध्ये पावसाची जोरदार हजेरी

**कोल्हापूर :** राज्यात परतीच्या पावसाने पुन्हा एकदा जोर धरला असून शनिवारी (दि. १७) कोल्हापूर, सांगलीसह नाशिकमध्ये विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडला. अचानक आलेल्या या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली.

कोल्हापूर जिल्ह्यात दुपारनंतर पावसाने जोरदार हजेरी लावली. कोल्हापूर शहरासह इचलकरंजी, कागल आणि पन्हाळा परिसरात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस झाला. सांगलीमध्ये दुपारच्या सुमारास ढगांच्या गडगडाटासह पावसाला सुरुवात झाली. जिल्ह्यातील कडेगाव आणि तासगाव तालुक्यांत मुसळधार पाऊस झाल्याने रस्ते जलमय झाले होते. उत्तर महाराष्ट्रातही पावसाने हजेरी लावली असून नाशिकच्या बागलाण तालुक्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. दरम्यान, पावसाचा जोर पुढील २४ तास कायम राहण्याची शक्यता आहे.



खारघर : नवरात्रीच्या पावन पर्वात भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर येथे विविध ठिकाणी भेट देऊन देवींचे दर्शन घेतले आणि भाविकांशी संवाद साधत नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजप शहर मंडळ अध्यक्ष व नगरसेवक प्रवीण पाटील, नगरसेवक मधु पाटील, नरेश ठाकूर, नगरसेविका परेशा पटेल, अनिता पाटील, उषा अडसुळे, भाजप उत्तर रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, वासुदेव पाटील, दीपक शिंदे, अमर उपाध्याय, फुलाजी ठाकूर, शुभ पाटील आदी उपस्थित होते.

## निवडक

### मिनीबस पुलावरून कोसळून आठ जणांचा दुर्दैवी मृत्यू

**जयपूर :** राजस्थानमधील कोटा जिल्ह्यात शनिवारी (दि. १७) सकाळी दिल्ली–मुंबई एक्स्प्रेस–वेवर प्रवाशांनी भरलेली एक मिनीबस अनियंत्रित होऊन पुलावरून सुमारे १५ फूट खाली नाल्यात कोसळली. या भीषण अपघातात चालकासह आठ जणांचा जागीच मृत्यू झाला असून २५पेक्षा अधिक प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. हे सर्व जण मध्य प्रदेशातून राजस्थानमधील खाटूश्यामजीच्या दर्शनाला चालले होते.

### सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांना सशर्त जामीन

**नवी दिल्ली :** कॉक्रोच जनता पार्टी (सीजेपी)चे संस्थापक अभिजित दिपके यांना काही अटी–शर्थींच्या अधीन राहून जामीन मंजूर करण्यात आला आहे. तिरंगा मार्चच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी दिल्ली पोलिसांनी दिपके यांना ताब्यात घेतले होते. त्यांना शनिवारी (दि.१७) विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले. शांतता करारावर स्वाक्षरी केल्यानंतर दिपकेंना जामीन मंजूर करण्यात आला.

# लहान मुलांना इंटरनेट बंदीस 'सर्वोच्च' नकार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



लहान मुलांच्या ऑनलाइन सुरक्षेबाबत सर्वोच्च न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय दिला आहे. इंटरनेट वापरण्याचा अधिकार हा लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकाचा मूलभूत हक्क असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. मुलांची सुरक्षा आणि त्यांचे स्वातंत्र्य या दोन वेगवेगळ्या गोष्टी नसून दोन्ही एकत्र जपणे गरजेचे आहे, असे परखड मतही न्यायालयाने मांडले आहे.

न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने या प्रकरणावर सुनावणी केली. इंटरनेट आणि सोशल मीडियावरून मुलांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित आक्षेपार्ह मजकूर हटवण्यासाठी कडक यंत्रणा उभारण्याचे निर्देश देताना न्यायालयाने ही टिप्पणी केली. मुलांना इंटरनेट वापरण्यापासून पूर्णपणे रोखणे चुकीचे असून त्याऐवजी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर 'चाइल्ड मोड'सारखे सुरक्षित पर्याय उपलब्ध करून देऊन त्यांच्या सुरक्षेची काळजी घेतली पाहिजे, असे सूचक मत खंडपीठाने व्यक्त केले.

आपल्या आदेशात सुप्रीम कोर्टाने नमूद केले की, संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांवर फक्त मोठ्यांचाच हक्क नाही, तर मुलांचाही तितकाच अधिकार आहे. एखाद्या ठरावीक वयाखालील मुलांना समज नसते किंवा त्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य नसते, असा विचार करून त्यांना या अधिकारांपासून पूर्णपणे दूर ठेवणे अयोग्य आहे. मुलांचे संरक्षण करणे जितके गरजेचे आहे, तितकेच त्यांचे स्वातंत्र्य जपणेही आवश्यक आहे. या दोन्ही गोष्टी एकमेकांच्या विरोधात नसून मुलांना सुरक्षा आणि स्वातंत्र्य दोन्ही दिले पाहिजे.

इंटरनेट हे केवळ माहितीचे साधन नसून ज्ञान, सर्जनशीलता आणि विचारांची देवाणघेवाण करण्याचे मोठे व्यासपीठ आहे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील मुलांसाठी इंटरनेट हे शिक्षणाचे आणि नवीन गोष्टी शिकण्याचे एकमेव साधन ठरत आहे. याशिवाय विशेष गरजू मुलांसाठी इंटरनेट हे असे एक माध्यम आहे, जिथे ते त्यांच्यासारख्या इतर मुलांशी जोडले जाऊ शकतात आणि आपले अनुभव शेअर करू शकतात. त्यामुळे इंटरनेट बंद करणे हा उपाय असू शकत नाही, असा निष्कर्ष न्यायालयाने काढला.

# खासगी रुग्णालयांना सेवासुविधांचे दर ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक

**मुंबई : प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व खासगी रुग्णालये आणि अन्य वैद्यकीय आस्थापनांना वैद्यकीय सेवा व उपलब्ध सुविधांचे दर रुग्णांना सहज दिसतील, अशा ठिकाणी ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक केले आहे. यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांना उपचारांच्या संभाव्य खर्चाची पूर्वकल्पना मिळून वैद्यकीय खर्चाचे नियोजन करता येणार आहे.

केंद्र शासनाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने हे परिपत्रक जारी करण्यात आले आहे. मुंबई शुश्रूषा गृह नोंदणी अधिनियम १९४९ अंतर्गत नोंदणीकृत खासगी रुग्णालये आणि अन्य वैद्यकीय आस्थापनांनी महाराष्ट्र नर्सिंग होम नियमावली २०२१मधील अनुसूची तीनमध्ये नमूद सेवा व सुविधांचे दर प्रदर्शित करावेत. या नियमावलीनुसार क्लिनिकल आणि रुग्णालयीन सेवांचे दर दर्शनी भागात प्रदर्शित करणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक आहे.

दरपत्रक मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये असावे. ते रुग्णालयाच्या आवारातील महत्त्वाच्या, स्पष्टपणे नजरेस पडणाऱ्या आणि सहज पोहोचता येणाऱ्या ठिकाणी लावावे. रुग्णालयाने दरांमध्ये बदल केल्यास दरपत्रक तत्काळ अद्ययावत करावे. देयकांबाबतच्या तक्रारी टाळण्यासाठी रुग्णांना लागू सेवा शुल्क आणि विविध पॅकेजच्या दरांची पुरेशी माहिती द्यावी. नोंदणी कक्ष, चौकशी कक्ष आणि बिलिंग काउंटरवरील कर्मचाऱ्यांनी रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांना दरपत्रक आणि शुल्काबाबत आवश्यक मार्गदर्शन करावे. मेडिकल व्हिसा किंवा आयुष व्हिसावर भारतात उपचारांसाठी येणाऱ्या परदेशी रुग्णांना सेवा देणाऱ्या रुग्णालयांनी त्यांच्यासाठी लागू असलेले विशेष पॅकेज दरही स्पष्टपणे प्रदर्शित करावेत, असे सूचित करण्यात आले आहे.

याशिवाय रुग्णालयांची नोंदणी, नियमन आणि देखरेख करणाऱ्या सक्षम प्राधिकरणांनी दरप्रदर्शनाच्या नियमांच्या अनुपालनाचा वेळोवेळी आढावा घ्यावा. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर आवश्यक प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी. सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि महानगरपालिकांच्या वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांनी हे परिपत्रक त्यांच्या कार्यक्षेत्रातील खासगी रुग्णालये व अन्य वैद्यकीय आस्थापनांच्या निदर्शनास आणून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असेही शासन निर्णयात नमूद केले आहे.

## गरबा रमतो जाय...





पनवेल : येथील सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने मिडलक्लास हौसिंग सोसायटी मैदानात आयोजित करण्यात आलेल्या झंकार नवरात्रोत्सवात गरबा आणि दांडियाचा जल्लोष पाहायला मिळत आहे. या माध्यमातून धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक सलोखा यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळत असून पनवेलकरांसाठी हा उत्सव आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. (अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

# कोकण रेल्वेची परदेशातही भुरळ

## काँगोत मेट्रो बांधणार, श्रीलंकेतही काम

**रत्नागिरी : प्रतिनिधी**



कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडने ३७ वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण करत आर्थिक आघाडीवर भक्कम कामगिरी केली आहे. ३७ वर्षांची वाटचाल पूर्ण करताना आर्थिक कामगिरी, पायाभूत सुविधा, प्रवासी सेवा आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे. १९९.६३ कोटींचा निव्वळ नफा आणि २३ हजार कोटींहून अधिकची कामे हाती घेत महामंडळाने देशांतर्गत यशानंतर आता परदेशातही आपला विस्तार सुरू केला आहे.

गेल्या अडीच वर्षांत महामंडळाला २० हजार ५९ कोटी रुपयांचे नवीन प्रकल्प मिळाले असून सध्या २३ हजार ५५२ कोटी रुपयांची कामे विविध टप्प्यांवर सुरू आहेत. कोकण रेल्वेच्या वाढत्या विश्वासार्हतेमुळेच इतक्या मोठ्या प्रमाणावर प्रकल्प मिळत असल्याचे सांगण्यात येत आहे. प्रवासी सेवेत सुधारणा, मालवाहतूक क्षमता वाढ आणि तांत्रिक आधुनिकीकरणावर भर देत महामंडळाने ही प्रगती साधली आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवरही महामंडळाने आपले पाय रोवण्यास सुरुवात केली आहे. काँगो प्रजासत्ताकातील मेट्रो बांधकामाचे काम लवकरच सुरू करण्याचे नियोजन असून या प्रकल्पामुळे मेट्रो बांधकाम क्षेत्रात जागतिक अनुभव मिळणार आहे. याशिवाय श्रीलंकेतील रेल्वे पुलांचे पुनर्वसन आणि नव्याने बांधकाम करण्याच्या प्रकल्पांच्या निविदा प्रक्रियेतही महामंडळ सहभागी झाले आहे.

# दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी व्यावसायिक पाठबळ आवश्यक -राज्यपाल

**मुंबई : प्रतिनिधी**

दिव्यांग व्यक्तींच्या क्षमता ओळखून त्यांना योग्य संधी, प्रोत्साहन आणि सन्मान दिल्यास त्या स्वावलंबी होऊन समाजाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात. व्यावसायिक उपक्रमांमध्ये सामाजिक बांधिलकी, करुणा आणि सेवाभाव यांची जोड दिल्यास त्यातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणता येते. दिव्यांग व्यक्तींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत त्यांच्यातील कौशल्य आणि आत्मविश्वासाला व्यासपीठ देणारा 'मिट्टी कॅफे' हा सामाजिक समावेशकतेचा प्रेरणादायी उपक्रम असल्याचे प्रतिपादन राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केले.




राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते मुंबईतील ओबेरॉय स्कायसिटी मॉल येथे 'मिट्टी कॅफे'चे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी आमदार अतुल भातखळकर, उत्तर प्रदेश विधानसभेचे माजी आमदार सुभाष पासी, ज्येष्ठ पत्रकार कुमार राकेश, मिट्टी कॅफेच्या संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी अलिना आलम, स्कायसिटी मॉलचे प्रतिनिधी तसेच 'प्रोजेक्ट मुंबई'चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी उपस्थित होते. यावेळी मिट्टी कॅफेमध्ये कार्यरत दिव्यांग सदस्यांचे पालकही उपस्थित होते. मिट्टी कॅफे ही भारतातील एक खास कॅफे साखळी आहे. हा सामान्य कॅफे नसून २०१७ मध्ये अलिना आलम यांनी सुरू केलेला एक सामाजिक उपक्रम आहे. हा कॅफे पूर्णपणे शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक अपंगत्व असलेल्या प्रौढ व्यक्तींकडून चालवला जातो आणि त्यांना आर्थिक स्वावलंबन, सन्मान आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात रोजगार मिळवून देणे हे त्याचे ध्येय आहे.

आज देशभरात याची ८० ठिकाणे आहेत, ज्यात सर्वोच्च न्यायालय, राष्ट्रपती भवन, मुंबई, बंगळुरू आणि लखनऊ विमानतळे तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांचा समावेश आहे. इन्फोसिस, विप्रो आणि मर्सिडीज–बेंझ यांसारख्या कॉर्पोरेट पार्क्समध्येही हे कॅफे आहेत.आपल्या भाषणात राज्यपालांनी मिट्टी कॅफेच्या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, व्यक्तीचे कार्य, तिचे प्रयत्न आणि कामाप्रती असलेले समर्पण यातून तिच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. प्रत्येक भावना व्यक्त करण्यासाठी शब्दांची आवश्यकता नसते. अनेकदा व्यक्तीची कृती आणि कामातील प्रामाणिकपणा हेच तिच्या विचारांचे प्रभावी माध्यम ठरतात. मिट्टी कॅफेमध्ये कार्यरत दिव्यांग व्यक्ती आपल्या कामातून ही बाब सिद्ध करत आहेत.व्यवसाय आणि सामाजिक जबाबदारी यांची सांगड घालणे ही काळाची गरज आहे. व्यावसायिक उपक्रम राबविताना केवळ आर्थिक लाभाचा विचार न करता समाजातील विविध घटकांच्या गरजा, त्यांच्या क्षमता आणि त्यांना उपलब्ध करून देता येणाऱ्या संधी यांचाही विचार केला पाहिजे.

व्यावसायिक संस्थांनी सामाजिक संवेदनशीलता जपत समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन राज्यपालांनी केले.दिव्यांग व्यक्तींच्या काम करण्याच्या पद्धतीपेक्षा त्यांच्यातील क्षमता, कामाप्रती असलेली निष्ठा आणि समर्पण यांना महत्त्व दिले पाहिजे. दिव्यांग व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करून घेणे, त्यांना रोजगार उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या कार्याचा सन्मान करणे आवश्यक आहे, असे राज्यपालांनी अधोरेखित केले.मिट्टी कॅफेसारखे उपक्रम दिव्यांग व्यक्तींविषयी समाजाचा दृष्टिकोन बदलण्यास मदत करतात. अशा उपक्रमांमधून दिव्यांग व्यक्तींच्या क्षमतेची ओळख निर्माण होते आणि त्यांना केवळ मदतीची गरज असलेला घटक न मानता समाजाच्या प्रगतीतील सक्रिय भागीदार म्हणून पाहण्याची दृष्टी विकसित होते, असेही त्यांनी सांगितले.मिट्टी कॅफेच्या संस्थापक अलिना आलम यांनी या उपक्रमाच्या प्रवासाची माहिती दिली. दिव्यांग व्यक्तींना आर्थिक स्वावलंबन आणि सन्मानाने जगण्याची संधी मिळावी, या उद्देशाने त्यांनी या उपक्रमाची सुरुवात केली.

एका छोट्या टेबल आणि छत्रीपासून सुरू झालेला हा प्रवास आज देशभरातील सुमारे ८० ठिकाणी पोहोचला असून, या कॅफेचे संचालन दिव्यांग व्यक्ती करतात.या उपक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत दोन कोटींहून अधिक कॉफीचे कप ग्राहकांना देण्यात आले असून, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना ८० लाखांहून अधिक जेवणाची ताटे वितरित करण्यात आली आहेत.

दरम्यान, योग्य संधी आणि पाठबळ मिळाल्यास दिव्यांग व्यक्ती स्वतः स्वावलंबी होण्यासोबतच समाजातील इतर गरजू घटकांनाही मदत करू शकतात, असे अलिना आलम यांनी यावेळी सांगितले. दिव्यांग व्यक्तींच्या क्षमतेविषयी जनजागृती करणे, त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि समाजात सर्वसमावेशकतेची भावना रुजविणे हे मिट्टी कॅफेचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कॅफेमधील दिव्यांग सदस्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. यावेळी दोन दिव्यांग सदस्यांनी आपले अनुभव उपस्थितांसमोर मांडले.

## निवडक

### बांधकाम साइटवरून प्लेटची चोरी

**पनवेल** : पनवेलजवळील पुष्पकनगर येथील बालाजी व्हेंचरच्या बांधकाम साइटवरून दोन लाख १० हजार रुपये किमतीच्या १४ ॲल्युमिनियम प्लेट्स चोरी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी तीन तरुणांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण आणि पोलीस अंमलदार सम्राट डाकी, अनिल चव्हाण, दत्ता जाधव, साईनाथ मोकल, विशाल दुधे, अभिजित गडकरी व सचिन कोर यांनी तांत्रिक माहिती आणि तपासाच्या आधारे प्रेम पाटील, कलीम अन्वर मलिक आणि रोहन शर्मा या तिघांना ताब्यात घेतले आहे.

### गांजा विक्रीप्रकरणी महिलेला अटक

**पनवेल** : बंबावीपाडा येथील एचपी पेट्रोल पंपाजवळील झोपडपट्टीत गांजा विक्री होत असल्याच्या माहितीवरून पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत पार्वती जाधव (रा. बंबावीपाडा) हिच्या झोपडीतून ४५४ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. महिला गांजा विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी कारवाई करून गांजा जप्त केला. याप्रकरणी संबंधित महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### कारची काच फोडून रोकड लंपास

**पनवेल** : खारघर सेक्टर १३ येथील तिआरा कॉम्प्लेक्स परिसरात पार्क केलेल्या कारची काच फोडून अज्ञात चोरट्याने दोन लाख ८५ हजार रुपयांची रोकड चोरून नेली. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुमित पुगावकर (रा. नेरूळ, सेक्टर ८) यांनी तिआरा कॉम्प्लेक्स येथे आपली कार पार्क केली होती. यावेळी अज्ञात चोरट्याने कारची काच फोडून आतील दोन लाख ८५ हजार रुपयांची रोकड लंपास केली. याप्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

### बोलण्यात गुंतवून चेन लंपास

**पनवेल** : ओळखीचे असल्याचे भासवून बोलण्यात गुंतवत एका ६४ वर्षीय इसमाची सोन्याची चेन आणि रोख रक्कम असलेले पाकीट चोरून नेल्याची घटना पनवेलमधील टपाल नाका परिसरात घडली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एकनाथ परशुराम पाटील (रा. वेशवी, उरण) हे दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास टपाल नाका परिसरात आले होते. त्यावेळी दोन अनोळखी इसमांनी 'मला ओळखले का?' असे विचारत त्यांना बोलण्यात गुंतवले. त्यानंतर हातचलाखीने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन आणि खिशातील पैसे असलेले पाकीट चोरून ते पसार झाले. याप्रकरणी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### घराचे कुलूप तोडून चोरी

**पनवेल** : खारघर सेक्टर १० येथे घराच्या दरवाजाची कडी तोडून चोरट्याने चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ९५ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विवेक कुंडे हे घरी नसताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या दरवाजाची कडी तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर कपाटात ठेवलेले चांदीचे दागिने आणि रोख रक्कम घेऊन चोरटा पसार झाला. याप्रकरणी खारघर पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### कारच्या व्यवहारात फसवणूक

**पनवेल** : नादुरुस्त कार चांगल्या स्थितीत असल्याचे सांगून विक्री केल्यानंतर पैसे परत न करता तीच कार दुसऱ्या व्यक्तीला विकल्याप्रकरणी अजान नासिर अली अन्सारी (रा. विक्रोळी) व शाहरुख मेहबूब पठाण (रा. घाटकोपर पश्चिम) यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या व्यवहारात विक्रम बुचकूल यांची एक लाख रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार आहे. तळोजा फेज–१, सेक्टर १० येथील भूमी मेडिकलजवळ आरोपींनी ओएलएक्सवर कार विक्रीची जाहिरात टाकली होती. कार चांगल्या स्थितीत असल्याचे सांगून त्यांनी बुचकूल यांच्याकडून ऑनलाइन एक लाख रुपये घेतले, मात्र तपासणीनंतर कार नादुरुस्त असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर बुचकूल यांनी कार आरोपींना परत केली, मात्र पैसे परत न करता आरोपींनी ती कार अन्य व्यक्तीला विकल्याचा आरोप आहे.

## नवी मुंबईतील शाळांमध्ये वाचन प्रेरणा दिन जल्लोषात साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महापालिकेच्या तसेच सर्व माध्यमांच्या आणि व्यवस्थापनाच्या २२५हून अधिक शाळांमध्ये 'वाचन प्रेरणा दिन' अत्यंत उत्साहाने व विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.



डॉ. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सर्व वयोगटातील नागरिकांमध्ये विशेषतः विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी यावर्षीच्या उपक्रमांमध्ये पालकांनाही विशेषत्वाने सहभागी करून घेण्यात आले होते.या अंतर्गत पुस्तक वाचनाचे विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये पालकांनी स्वतःसोबत आणलेली वर्तमानपत्रे, छोट्या गोष्टींची मोठ्या अक्षरांमधील पुस्तके, कादंबऱ्या आणि आत्मचरित्रे यांमधील निवडक उतारे विद्यार्थ्यांना वाचून दाखवले. यासोबतच काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी एकत्र येत अत्यंत उत्साही वातावरणात सामूहिक कविता वाचन केले. काही शाळांमध्ये शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा सहभाग घेत शाळेच्या ग्रंथालयातील दर्जेदार पुस्तकांचे आकर्षक प्रदर्शन भरवले होते, ज्याला अनेक पालकांनीही भेट दिली आणि या उपक्रमाचे कौतुक केले.

यावेळी काही विद्यार्थ्यांनी नियमित वाचनामुळे त्यांच्या अभ्यासामधील एकाग्रता कशी वाढली, याबाबतचे आपले स्व–अनुभव सर्वांसमोर मांडले.अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या वाढदिवसाच्या दिवशी शाळेच्या वाचनालयाला एक पुस्तक भेट देण्याचा कौतुकास्पद निर्णय जाहीर केला.वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून काही शाळांमध्ये मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना 'वाचन साक्षर' होण्याचे महत्त्व समजावून सांगितले. त्याचप्रमाणे "नियमित वाचन न केल्यास ज्ञानाच्या कक्षा कशा मर्यादित राहतात आणि त्याचे काय दुष्परिणाम होतात," याविषयी शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये जागृती केली.

दररोज वाचन केल्याने ज्ञान वाढते आणि त्या ज्ञानाचा दैनंदिन जीवनात कसा उपयोग होतो, यावर पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये सलोख्याचा सुसंवाद घडून आला. माजी राष्ट्रपती आणि थोर शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणादायी चरित्रापासून शिकवण घेत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी शाळा स्तरावर 'वाचाल तर वाचाल' हा मोलाचा संदेश देत सर्व शाळांमध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



**कामोठे** : परेशदादा ठाकूर प्रतिष्ठान आयोजित आणि आदर्श युवा मित्र मंडळ पुरस्कृत सेक्टर ४ची आई माऊली नवरात्रोत्सव. मंडळाचे अध्यक्ष नागेश केसकर, उपाध्यक्ष बबन बारगजे, सचिव आशिष फुटाणे, खजिनदार प्रशांत देवकर, सल्लागार लहूशेठ मलकमीर, संयोजक महेश बारगजे, आयोजिका नगरसेविका बायजा बारगजे आहेत.

## तळोजा ड्रग्ज प्रकरणाचे दिवा–मुंब्रा कनेक्शन उघड

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अमली पदार्थ तस्करीच्या गुन्ह्याचे धागेदोरे दिवा–मुंब्रा परिसरापर्यंत पोहचले आहेत. नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थविरोधी पथकाने (एएनसी) कारवाई करत एका नायजेरियन नागरिकासह आसाममधील महिलेला अटक केली आहे. हे दोघे संबंधित प्रकरणातील मुख्य अमली पदार्थ पुरवठादार असल्याचे तपासात समोर आले आहे.

डेस्टिनी अकाच्युक्वु उगोच्युक्वु (३४) आणि पूनम बसनेट (३०) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. दोघेही दिवा–मुंब्रा परिसरात राहत होते. तळोजा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याच्या तपासादरम्यान अमली पदार्थ पुरवठा साखळीतील या दोघांची नावे निष्पन्न झाली. त्यानंतर पोलिसांनी कारवाई करून त्यांना ताब्यात घेतले. तपासात नायजेरियन आरोपी स्वतःच्या बँक खात्याशी संबंधित क्यूआर कोड किंवा स्कॅनर पाठवून त्याद्वारे पैशांचा स्वीकार करत असल्याचे उघड झाले आहे.

त्यामुळे अमली पदार्थांच्या व्यवहारांसाठी वापरल्या जाणाऱ्या आर्थिक व्यवहारांची साखळी शोधण्यावर पोलिसांनी लक्ष केंद्रित केले. दोन्ही आरोपींना अटक करून पोलीस कोठडी घेण्यात आली. या प्रकरणात एकूण तीन आरोपींना अटक करण्यात आली असल्याची माहिती अमली पदार्थविरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांनी दिली. अमली पदार्थांचा पुरवठा नेमका कुठून होत होता, या व्यवहारांत आणखी कोणाचा सहभाग आहे आणि आर्थिक व्यवहारांचे जाळे किती मोठे आहे याचा तपास पोलीस करीत आहेत.

## डॉ. पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिर



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

डॉ. हेमंत पाटील यांच्या ५०व्या वाढदिवसानिमित्त कामोठे सेक्टर ३४, मानसरोवर कॉम्प्लेक्स येथील साई द्वारका क्लिनिकच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन रविवारी (दि. १८) क्लिनिकमध्ये करण्यात आले आहे. पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम पार पडणार असून शिबिराची वेळ सकाळी ९ ते दुपारी १ अशी आहे.

## बॅटऱ्यांची चोरी करणारा तरुण ताब्यात

**पनवेल** : पनवेलजवळील विठ्ठलवाडी मंदिर परिसरातील मैदानात दोन हायवा डम्परच्या चार बॅटऱ्या चोरी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी अक्षय राठोड याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ६२ हजार रुपये किमतीच्या चार बॅटऱ्या हस्तगत करण्यात आल्या. रात्रीच्या सुमारास विठ्ठलवाडी, आवटी मैदान, आवळेगाव परिसरात ही चोरी झाली होती. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण आणि पोलीस अंमलदार सम्राट डाकी, अनिल चव्हाण, दत्ता जाधव, साईनाथ मोकल, विशाल दुधे, अभिजित गडकरी व सचिन कोर यांनी तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीला ताब्यात घेतले.

## वीजचोरीप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल** : वीजचोरी केल्याप्रकरणी जिथीन जोसेफ कानापल्ली (रा. तळोजा) यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात १५ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिथीन कानापल्ली यांच्या बर्फाच्या कारखान्याच्या वीज वापरासाठी ६ फेब्रुवारी ते जुलै २०२६ या कालावधीत वीजचोरी करून महावितरण कंपनीचे १६ लाख ५६ हजार ३०० रुपयांचे नुकसान करण्यात आले. याबाबत त्यांना वीजचोरीचे देयक देण्यात आले होते, मात्र त्यांनी ते भरले नाही.

## महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी गुन्हा

**पनवेल** : महिलेचा हात हातात धरून कवटाळल्याने पुंडलिक पाटील (५५) यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात १५ ऑक्टोबरला गुन्हा दाखल करण्यात आला. १४ ऑक्टोबर रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास पीडित फिर्यादी राहत असलेल्या फ्लॅटमध्ये आरोपी प्लंबर पुंडलिक पाटील याने फिर्यादी एकट्याच असल्याचा फायदा घेत त्यांचा हात हातात घेतला आणि त्यांना कवटाळले. तसेच नवऱ्याला सांगू नको, असे बोलून त्यांना धमकी दिली.

## नवी मुंबईत सेवा संकल्प अभियानाची उत्साहात सांगता

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात आलेल्या सेवा संकल्प अभियानाची सांगता अत्यंत उत्साहात, भावूक आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. ही सेवा केवळ एका महिन्यापुरती सीमित न ठेवता भविष्यातही अखंड आणि निरंतर सुरू ठेवण्याचा ठाम निर्धार या सांगता सोहळ्यात करण्यात आला. शासन व नवी मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात ५००० वृक्ष लागवडीचा हरित टप्पा पूर्ण करण्यात आला असून विविध सेवाभावी संस्थांच्या कार्यप्रदर्शन स्टॉल्सचे भव्य उद्‌घाटनही करण्यात आले.



यावेळी उपमहापौर दशरथ भगत, सभागृहनेते सागर नाईक यांनी या सोहळ्याचे कौतुक केले. सेवा संकल्प अभियानाच्या अंतर्गत संपूर्ण महिनाभर शाळांमधून विविध प्रबोधनात्मक उपक्रम राबवण्यात आले. निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि वादविवाद स्पर्धा यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वैचारिक जागृती करण्यात आली. तसेच नशामुक्त भारत प्रबोधन, वाहतूक सुरक्षा, विद्युत सुरक्षा, सायबर सिक्युरिटी, ई–वेस्ट व्यवस्थापन व प्लास्टिक वर्गीकरण यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर व्यापक स्तरावर प्रबोधन व जनजागृती करण्याचे कार्य शाळांनी केले. सांगता सोहळ्यात पीएम श्री राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय आणि मान्यवर कांशीराम जयंती विद्यालय या शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून कृतियुक्त सहभाग दर्शवला व वृक्षारोपण केले.

सोहळ्यात उपस्थितांशी संवाद साधताना माजी महापौर सुधाकर सोनवणे अत्यंत भावूक झाले. ते म्हणाले की, खरे आयुष्य हे मरणानंतर सुरू होते. व्यक्ती मेल्यानंतर किती वर्षे लोकांच्या मनात जगते हे त्याच्या कर्मावर अवलंबून असते. मृत्यूनंतरही जिवंत राहण्यासाठीची धडपड प्रत्येकात असली पाहिजे. त्यातूनच मोठी कार्ये घडतात. आज आपण ज्या महनीय व्यक्तींना पूजतो, त्यांना जिवंत असताना खूप टीका आणि अपमान सहन करावा लागला; पण ते कर्मावर ठाम राहिल्यामुळे आज समाज त्यांचे पूजन करतो. ग्लोबल वॉर्मिंग आणि हवामान बदलाचे संकट पाहता पर्यावरण संवर्धन करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

# पनवेल पोलिसांची मोठी कारवाई

## ४८ गुन्ह्यांची उकल, १.२२ कोटींचा मुद्देमाल परत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल परिमंडळातील पोलिसांना चोरीच्या विविध गुन्ह्यांचा तपास करून त्यांची उकल करण्यात मोठे यश आले आहे. सात पोलीस ठाण्यांच्या हद्दीत दाखल झालेल्या चोरीच्या गुन्ह्यांपैकी तब्बल ४८ गुन्ह्यांची उकल करून पोलिसांनी एक कोटी २२ लाख ९४ हजार २६७ रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. हा मुद्देमाल संबंधित मूळ मालकांना परत करण्यात आला.



नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ-३ अंतर्गत येणाऱ्या पनवेल शहर, पनवेल तालुका, खांदेश्वर, कामोठे, कळंबोली, खारघर आणि तळोजा या सात पोलीस ठाण्यांच्या हद्दीत चोरीचे विविध गुन्हे दाखल झाले होते. चोरीस गेलेल्या मालमत्तेचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विशेष तपास मोहीम राबवली. तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. या कारवाईत १४० मोबाईल फोन, १२९ ग्रॅम सोने, ४७ तोळे चांदी, आठ वाहने आणि १७ लाख ३४ हजार ७०० रुपयांची रोख रक्कम तसेच अन्य मौल्यवान वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत.

अनेक दिवसांपासून चोरीस गेलेल्या अथवा हरवलेल्या वस्तू पुन्हा मिळाल्याने तक्रारदारांनी समाधान व्यक्त केले. पोलीस उपायुक्त, परिमंडळ-३ पनवेल तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त (पनवेल विभाग) मयूर भुजबळ आणि सहाय्यक पोलीस आयुक्त विक्रम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित पोलीस ठाण्यांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही कामगिरी बजावली. नवी मुंबई पोलिसांच्या उपायुक्त रश्मी नांदेडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ आणि सहाय्यक पोलीस आयुक्त विक्रम कदम यांच्या हस्ते चोरीचा हस्तगत केलेला मुद्देमाल संबंधित नागरिकांच्या स्वाधीन करण्यात आला.

गुन्ह्यांची उकल करून आरोपींचा शोध घेण्याबरोबरच चोरीस गेलेली मालमत्ता तक्रारदारांना परत मिळवून देण्यावरही पोलिसांनी भर दिला आहे. तब्बल १.२२ कोटी रुपयांचा मुद्देमाल नागरिकांना परत करण्याच्या या कारवाईमुळे पनवेल परिमंडळातील पोलिसांच्या तपास कामगिरीचे कौतुक होत असून विश्वास अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे.

# तळोजा मध्यवर्ती कारागृहात चरस तस्करीचा प्रयत्न उघड

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा मध्यवर्ती कारागृहाच्या कडेकोट सुरक्षाव्यवस्थेतही अमली पदार्थ पोहचवण्याचा प्रयत्न होत असल्याचे समोर आले आहे. कारागृहातील मुलाखत प्रतीक्षालयाच्या पत्र्यावर चरस असलेली पुडी आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. या पुडीत १९.४ ग्रॅम चरस असून त्याची अंदाजे किंमत ५०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

कारागृहाच्या आतील बाजूस असलेल्या मुलाखत प्रतीक्षालयाच्या पत्र्यावर एक संशयास्पद पारदर्शक प्लास्टिकची पुडी आढळली. कारागृहातील पोलिसांनी तपासणी केली असता या पुडीत तपकिरी रंगाचा चिकट चरस (हशीश) असल्याचे निष्पन्न झाले. चरस कागदामध्ये गुंडाळून त्यावर सुरक्षिततेसाठी पिवळ्या रंगाची सेलोटेप लावण्यात आली होती. प्राथमिक तपासानुसार कारागृहात बंदिस्त असलेल्या एखाद्या कैद्याला अमली पदार्थ पुरवण्याच्या उद्देशाने अज्ञात व्यक्तीने ही पुडी बाहेरून फेकली असावी, असा संशय व्यक्त करण्यात येत आहे, मात्र हा प्रकार नेमका कोणी केला आणि त्यामागे कोणाचा सहभाग आहे हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

घटनेची माहिती मिळताच खारघर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये (एनडीपीएस) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारागृहाच्या परिसरात अमली पदार्थ पोहचवण्याचा प्रयत्न करणारी व्यक्ती बाहेरील आहे की तिला कारागृहातील कोणाची मदत मिळाली, याचा तपास पोलीस करीत आहेत.

## तरुणांसाठी रोजगाराभिमुख प्रशिक्षण

**पनवेल** : तरुणांना तांत्रिक कौशल्याचे प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी यशवंत मेमोरियल ट्रस्ट, पनवेल यांच्या वतीने शासनमान्य रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत विविध प्रशिक्षण अभ्यासक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये कॉम्प्युटर हार्डवेअर व नेटवर्किंग, लॅपटॉप रिपेअरिंग, रेफ्रिजरेटर, एअर कंडिशनर, वॉशिंग मशीन व आरओ वॉटर प्युरिफायर दुरुस्ती, ऑटो सर्व्हिस टेक्निशियन आणि असिस्टंट इलेक्ट्रिशियन या अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

इच्छुकांनी अधिक माहिती व नावनोंदणीसाठी यशवंत मेमोरियल ट्रस्ट, पनवेल येथे संपर्क साधावा.

## पोलीस अंमलदार सम्राट डाकी 'कॉप ऑफ द मंथ'

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस अंमलदार सम्राट डाकी यांची सप्टेंबर २०२६ महिन्यासाठी 'कॉप ऑफ द मंथ' म्हणून निवड करण्यात आली आहे. विविध गुन्ह्यांतील आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्यात बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना हे प्रशंसापत्र देण्यात आले. पनवेल शहर पोलीस ठाण्यातील तीन गुन्ह्यांच्या तपासात आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी सम्राट डाकी यांनी केली.

त्यांच्या कामगिरीची दखल घेत पनवेल विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ यांनी प्रशंसापत्र देऊन त्यांचे अभिनंदन केले. भविष्यातही त्यांनी अशीच उत्कृष्ट कामगिरी करावी, अशा शुभेच्छा सहाय्यक पोलीस आयुक्तांनी दिल्या. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत विविध पोलीस ठाण्यांत त्या-त्या महिन्यात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या पोलिसांचे वरिष्ठांकडून कौतुक करून त्यांचा फोटो पोलीस ठाण्याच्या दर्शनी भागात लावण्यात येतो. त्यामुळे पोलिसांचे मनोधैर्य उंचावले आहे.



## 'सीकेटी'त पालक प्रबोधन कार्यक्रमास प्रतिसाद

### 'माझे मूल, माझी जबाबदारी'वर मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मुलांच्या जडणघडणीला योग्य दिशा देण्यासाठी पालकांनी सजग आणि जबाबदार असणे आवश्यक आहे. या विचाराला केंद्रस्थानी ठेवून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक विभागात मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पालक प्रबोधन कार्यक्रम उत्साहात झाला.



कार्यक्रमादरम्यान विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी उपस्थित मान्यवरांचे यथोचित स्वागत केले. त्यानंतर प्रमुख वक्ते सुहास पाटील यांनी पालकांशी संवाद साधत मुलांच्या भावविश्वाचे आकलन, त्यांच्यावर योग्य संस्कार, जीवनमूल्यांची रुजवण, आत्मविश्वासाची वाढ आणि मुलांच्या भावनिक, सामाजिक व बौद्धिक विकासातील पालकांचे योगदान याविषयी मार्गदर्शन केले.

'Raising Hearts, Shaping Future' संकल्पनेवर आधारित आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात प्रेरणादायी वक्ते व पालकत्वतज्ज्ञ सुहास पाटील यांनी 'माझे मूल, माझी जबाबदारी, मुलांच्या सर्वांगीण विकासाचा भक्कम पाया घडविण्यात पालकांची भूमिका' या विषयावर उपस्थित पालकांना मार्गदर्शन केले. केवळ शैक्षणिक यश मिळविणे म्हणजे मुलांचा सर्वांगीण विकास नव्हे, तर त्यांच्यामध्ये संवेदनशीलता, आत्मविश्वास, जबाबदारीची जाणीव आणि योग्य-अयोग्य यातील फरक ओळखण्याची क्षमता विकसित करणेही तितकेच महत्त्वाचे आहे, हा विचार कार्यक्रमातून अधोरेखित करण्यात आला. पालकांनी मुलांशी सुसंवाद साधावा, त्यांच्या भावना समजून घ्याव्यात आणि त्यांना प्रेम, विश्वास व योग्य मार्गदर्शन देत त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करावे, असे महत्त्वपूर्ण विचार या सत्रातून मांडण्यात आले.

कार्यक्रमास अतुल कदम, काजल पाटील, पालक प्रतिनिधी महेश पोपेटा, शाळेच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी, त्याचबरोबर पालकवर्ग तसेच शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शाळा आणि पालक यांच्यातील समन्वय अधिक दृढ करून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. उपक्रम मार्गदर्शक ठरला.

## रिटघर विद्यालयात भोंडला उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रिटघर येथील श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. १७) नवरात्रोत्सवानिमित्त भोंडला कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमात विद्यालयाच्या पर्यवेक्षिका बाबर व सर्व शिक्षकांच्या हस्ते हत्तीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी चांगले कार्य करण्यासाठी सुबुद्धी लाभावी, अशी प्रार्थना केली.



शिक्षक अमित पाटील यांनी भोंडला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. त्यानंतर वर्गानुसार गोल रिंगण करून देवीच्या गाण्यांवर गरबा व दांडिया नृत्य सादर करून आनंद द्विगुणित करण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रा. शिंदे यांनी कार्यक्रमाचे आयोजन करून त्याचे महत्त्व सांगितले.

# दीपाली पारसकर यांना न्यायसखी पुरस्कार

**पनवेल : वार्ताहर**

'क्रांती सम्राट' वृत्तपत्राच्या संपादिका दीपाली पारसकर यांना पत्रकारिता आणि सामाजिक बांधिलकीतील कार्याचा गौरव म्हणून 'न्यायसखी पुरस्कार' प्रदान करण्यात आला. कळंबोली येथे आयोजित कार्यक्रमात पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. न्यायसखी महिला व बालकल्याण समितीच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



■ महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते कळंबोलीत सन्मान

समितीच्या संस्थापक-अध्यक्षा ॲड. भूमिका जाधव आणि 'संविधान पर्व न्यूज'चे संपादक चंद्रकांत जाधव यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. पत्रकारिता हा लोकशाहीचा महत्त्वाचा आधारस्तंभ असून समाजातील अन्याय-अत्याचार आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याची महत्त्वपूर्ण भूमिका पत्रकार बजावतात. जनतेचा आवाज बुलंद करणे व सामाजिक न्यायाच्या प्रश्नांना व्यासपीठ मिळवून देणे या कार्याचे महत्त्व पुरस्काराच्या निमित्ताने अधोरेखित झाले. दीपाली पारसकर यांना मिळालेल्या सन्मानाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या गौरवामुळे पत्रकारिता क्षेत्रातील सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या कार्याला प्रोत्साहन मिळेल, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

## आध्यात्मिक झाँकी, राजयोग चित्र प्रदर्शन; सेवाव्रती महिलांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवरात्रोत्सवाच्या पावन पर्वानिमित्त साईनगर, पनवेल येथे प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, पनवेल सेवा केंद्र यांच्या वतीने एकदिवसीय आध्यात्मिक झाँकी आणि राजयोग चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात ब्रह्माकुमारीज पनवेल सेवा केंद्राच्या बी. के. तारा दिदी यांनी आध्यात्मिक मार्गदर्शन केले.



प्रदर्शनाच्या माध्यमातून नवरात्रीचे गूढ आध्यात्मिक रहस्य, देवीच्या चैतन्य स्वरूपाचे महत्त्व आणि राजयोग ध्यानाद्वारे आत्मिक शक्ती कशी वाढवता येते याविषयी माहिती देण्यात आली.

राजयोगाच्या अभ्यासातून मन:शांती, सकारात्मक विचार आणि जीवनात सुख, शांती व आनंद प्राप्त करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमांतर्गत समाजासाठी नि:स्वार्थ भावनेने सेवा करणाऱ्या सेवाव्रती महिलांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी ॲड. दीपाली बांद्रे आणि पोलीस अधिकारी प्रज्ञा मुंडे यांच्यासह सेवाभावी महिलांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. समाजहितासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेत त्यांच्या सेवाभावाला प्रोत्साहन देण्यात आले.

हा कार्यक्रम भाजपच्या वतीने आयोजित सार्वजनिक नवरात्र उत्सव अंतर्गत साईनगर महिला मंडळ, पनवेल यांच्या आयोजनाने संपन्न झाला. कार्यक्रमाचे स्थळ साईसागर सोसायटी, अक्षयपात्र फाउंडेशनसमोर, साईनगर, पनवेल येथे होते. या उपक्रमाच्या आयोजनात साईनगर महिला मंडळाच्या संस्थापक रेणुका मयुरेश नेतकर आणि अध्यक्ष मीनाक्षी चौहान यांचे सहकार्य लाभले.

## कर्नाळा स्पोर्ट्स क्लबजवळ दुचाकीस्वारांची स्टंटबाजी; पोलीस गस्तीची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

कर्नाळा स्पोर्ट्स क्लबजवळून दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दिशेने जाणारा बंद उन्नत मार्ग सध्या स्टंटबाजीचे ठिकाण बनत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. सुरक्षेसाठी लावलेले सिमेंटचे बॅरिकेड्स सरकवून काही तरुण दुचाकींवरून वेगाने वाहन चालवत स्टंट करीत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या मार्गावर सकाळी आणि सायंकाळी महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुले मोठ्या संख्येने चालण्याचा व्यायाम करण्यासाठी येतात, मात्र दुचाकींचा वेग आणि स्टंटबाजीमुळे अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. बंद मार्गावर बॅरिकेड्स सरकवून होणारी वाहनांची बेकायदा वर्दळ रोखण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. याशिवाय या परिसरात काही तरुण-तरुणींकडून आक्षेपार्ह वर्तन होत असल्याच्या तक्रारीही करण्यात आल्या आहेत. त्यामुळे कुटुंबांसह व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांना अस्वस्थतेचा सामना करावा लागत असल्याचे सांगण्यात येते.

या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलीस आणि वाहतूक पोलिसांनी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत नियमित गस्त घालावी, बॅरिकेड्स हटवून प्रवेश करणाऱ्या दुचाकीस्वारांवर कारवाई करावी आणि स्टंटबाजीला आळा घालावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. एखादा अपघात घडण्यापूर्वी पोलिसांनी या गंभीर प्रकाराची दखल घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## नवीन पनवेलमधील खराब रस्त्यांचे डांबरीकरण करा!

### नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांची महापौरांकडे मागणी

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल प्रभाग क्रमांक १७ मधील खराब रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून डांबरीकरण करावे, अशी मागणी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी महापौर नितीन पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



महापालिकेच्या विविध विकासकामांसाठी खोदण्यात आलेल्या रस्त्यांची कामे पूर्ण झाल्यानंतर योग्य प्रकारे दुरुस्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे रस्त्यांवर खड्डे पडले असून अनेक ठिकाणी पृष्ठभाग उखडला आहे. यामुळे नागरिकांना प्रवास करताना अडचणींचा सामना करावा लागत असून अपघातांचा धोकाही वाढला आहे. खराब रस्त्यांमुळे वाहनांच्या वर्दळीत धूळ उडून नागरिकांना प्रदूषणाचा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वार, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पावसाळा संपल्यानंतरही रस्त्यांची दुरवस्था कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. महापौरांनी संबंधित विभागाला तातडीने आदेश देऊन प्रभागातील सर्व खराब रस्त्यांची दुरुस्ती व डांबरीकरण लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी ॲड. भुजबळ यांनी केली आहे.

## लिमये वाचनालयात डॉ. अब्दुल कलाम जयंती साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालयात भारतरत्न व भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून वाचनालयाच्या अध्यक्ष ॲड. सुनीता जोशी यांच्या उपस्थितीत ज्येष्ठ वाचक व हितचिंतक सभासद दत्तात्रय जाधव यांनी अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.



यानिमित्ताने वाचनालयाचे कार्यकारिणी सदस्य काशिनाथ जाधव व राजकुमार ताकमोगे यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्याविषयी तसेच वाचन प्रेरणा दिनाविषयी विचार व्यक्त केले. कार्यक्रमास वाचनालयाचे उपाध्यक्ष बी. पी. म्हात्रे, सचिव जयश्री शेट्ये, कार्यकारिणी सदस्य स्मिता गांधी, निर्मला म्हात्रे तसेच वृत्तपत्र वाचकवर्ग उपस्थित होता. यानिमित्ताने डॉ. कलाम यांनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रंथपाल निकिता शिंदे, सहाय्यक ग्रंथपाल संपदा जोशी, लिपिक प्रतीक्षा गोखले यांनी परिश्रम घेतले.

## खारघरमधून व्यक्ती बेपत्ता; अपहरणाचा गुन्हा दाखल

**पनवेल** : खारघर येथील धामोळे कातकरवाडी परिसरातून लक्ष्मण तुळशीराम वाघे (४०) हे बेपत्ता झाले आहेत. याप्रकरणी खारघर पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. लक्ष्मण वाघे हे मूळचे अंबरनाथ येथील शिरवलीवाडीचे रहिवासी असून ते आपल्या मुलीकडे धामोळे कातकरवाडी येथे आले होते.

बेपत्ता व्यक्तीची उंची सुमारे पाच फूट दोन इंच, रंग सावळा, बांधा सडपातळ असून त्यांनी पांढऱ्या रंगाचा पूर्ण बाह्यांचा शर्ट, काळी पॅन्ट व काळ्या रंगाची चप्पल घातली होती. त्यांना मराठी भाषा येते. त्यांच्याबाबत कोणाला माहिती मिळाल्यास खारघर पोलिसांशी ८६५५३५४११६ किंवा नातेवाइकांशी ९६०४४५४७३३ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

# 'दिलवाले दुल्हनियाँ ले जायेंगे' फ्लॅशबॅक...

मुहब्बत का नाम आज भी मुहब्बत है... यह ना कभी बदली है और न कभी बदलेगी...

अगर यह तुम्हे प्यार करती है तो यह पलट के देखेगी... पलट... पलट

तुम्हारी जैसी लडकी के साथ मेरे जैसे लडके का होना बहुत जरुरी है...

राज मल्होत्रा (शाहरुख खान) व सिमरन सिंह (काजोल) यांची इंग्लंडमधील निसर्ग सौंदर्यात छोट्या छोट्या गोष्टीतून खुलत– फुलत रंगलेली आणि मग पंजाबमधील गुडगाव येथील सरसो की खेतीमध्ये छान क्लायमॅक्सकडे वळलेली 'दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगी'ची थोडी मस्ती, थोडी खट्टी प्रेम कथा नक्कीच आठवली असणार...

आपल्या देशात आवडलेला चित्रपट फक्त आणि फक्त पडद्यावर राहत नाही, तो चित्रपट रसिकांच्या मनात, हृदयात, डोक्यात फिट्ट घट्ट बसतो.



## झूम प्रहर

**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

याच ट्रेन्ड सेटर चित्रपटावर पुन्हा एकदा नव्याने 'फोकस' टाकायचा, तर विक्रम हे मोडण्यासाठीच असतात, पण काही विक्रम चक्क चक्रावून टाकणारे असतात...

यशराज फिल्म्सचा 'दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे' ( प्रदर्शनाची तारीख २० ऑक्टोबर १९९५) आजही म्हणजे एकतीस वर्षानंतरही दक्षिण मुंबईतील मराठा मंदिर चित्रपटगृहात चक्क १४००पेक्षाही जास्त आठवड्यात मॅटीनी खेळास दाखवला जातोय व थोडे फार का असेनात त्याला प्रेक्षक असतात. न्यू एक्सलसियर चित्रपटगृहात पहिला पन्नास आठवड्यांचा प्रवास केल्यावर 'डीडीएलजे' मराठा मंदिरला मॅटीनी शोला आला. मॅटीनी शोची तोपर्यंत आपली एक ओळख व परंपरा होती. मॅटीनी शोचं आपलं एक व्यक्तिमत्त्व होते, संस्कृती होती. जगभरात कुठेही कोणत्याही भाषेतील चित्रपटाने एखाद्या चित्रपटगृहात दीर्घकालीन मुक्काम नक्कीच केला नसावा व यापुढेही ते कदापि शक्य नाही. खरंतर एकादा यशस्वी चित्रपट पंचवीस, पन्नास (काही तर त्याहीपेक्षाही जास्त) आठवडे एकाद्या चित्रपटगृहात मुक्कामाला



राहण्याची संस्कृती आपलीच! साठ व सत्तरच्या दशकात तर अनेक चित्रपटांनी असे रौप्य महोत्सवी, सुवर्ण महोत्सवी आठवड्याचे यश मिळवून जोरदार पार्ट्या साजऱ्या करून स्टार्सना ट्रॉफीजही दिल्यात, पण एकतीस वर्षांची वाटचाल म्हणजे, अबब असेच म्हणायला हवे. असं असूनही हा चित्रपट आपल्याला अजिबात आवडला नाही असे म्हणणारेही आहेत. असं अनेक सुपर डुपर हिट चित्रपटाच्या बाबतीत घडते–बिघडते.




रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' (मुंबईतील प्रदर्शनाची तारीख १५ ऑगस्ट १९७५)चा विक्रम कोणी कधी मोडेल असे वाटले नव्हते. मिनर्व्हात 'शोले'ने दिवसा तीन खेळ असा ३१ ऑगस्ट १९७८ असा तीन वर्षे सलग, तर त्यानंतर त्यापुढे तेथेच मॅटीनीला आणखीन दोन वर्षे खणखणीत मुक्काम केला तेव्हा 'आठवड्याच्या आकड्यांचा विक्रम' कोणी कधी मोडेल असे वाटले नव्हते, पण 'डीडीएलजे'ने त्याबाबत 'शोले'वर मात केली असली तरी आजही 'शोले'चे सामाजिक अस्तित्व जाणवतेय. त्यात मूळ क्लायमॅक्स समाविष्ट करून तो पुन्हा एकदा प्रदर्शित करण्यात आला. नवीन तंत्रज्ञानयुक्त 'शोले'चा आजही जगातील विविध देशांमध्ये भव्य प्रीमियर आयोजित करण्यात येत आहे.



'डीडीएलजे' आला तेव्हा आपल्या देशात व्हिडीओ संस्कृती खोलवर स्थिरावली होती (१९८२च्या एशियाडच्या वेळेस आपल्या देशात व्हिडीओचे आगमन झाले व सिनेमा कॅसेटच्या रूपाने जणू मुठीत आला), एव्हाना उपग्रह वाहिन्यांही घराघरात चोवीस तास माहिती व मनोरंजनाचा जणू स्फोट झाला होता. घराचे फक्त चित्रपटगृहात रूपांतर व्हायचे शिल्लक होते. (कालांतराने होम थियेटर ही संकल्पना रूजली. त्याची सुरुवात याच टप्प्यावरची).




'डीडीएलजे'च्या आगमनास पूरक वातावरण निर्माण करण्याचे श्रेय 'हम आपके है कौन' ( ९ ऑगस्ट १९९४)ला द्यायला हवे. त्याने मधल्या काळात चित्रपटगृहापासून दुरावलेला सहकुटुंब सहपरिवार चित्रपट पाहणारा वर्ग पुन्हा चित्रपटगृहाकडे खेचून आणला. फरक इतकाच की आता 'महाग ते चांगलेच' अशी मानसिकता असणारा समाजातील उच्च मध्यम व त्यावरचा हा रसिक होता. मल्टिप्लेक्स युगाचा प्रारंभ होण्यापूर्वीचे हे दिवस होते, पण त्याकडे आपण वळू याचा जणू संकेत 'डीडीएलजे'ने दिला. याच टप्प्यावर इंग्लंड– अमेरिकेत उच्च शिक्षण व नोकरीला जाण्यास वेग आला. विदेशातील अनिवासी भारतीयांची पुढची पिढी वयात आली होती. आपल्याकडे ग्लोबलायझेशन रूजत होते. आणि याच वातावरण 'डीडीएलजे' ऐन दिवाळीत आला. त्याच्या स्पर्धेत प्रदर्शित झालेले डेव्हिड धवन दिग्दर्शित 'याराना' (अमिताभवाला नाही. ऋषि कपूर व माधुरी दीक्षितचा) आणि देव आनंदचा 'गॅन्गस्टर' हे चित्रपट केव्हाच इतिहासजमा झालेत.

यशराज फिल्म्सने या चित्रपटापासून जणू कात टाकलीय व आजही त्याचे सकारात्मक परिणाम दिसताहेत. आपले मोठे बंधू बी.आर. चोप्रा यांच्या सावलीतून बाहेर पडत यश चोप्रा यांनी स्वतःचे यशराज फिल्म्स हे बॅनर स्थापन केले तेव्हा व्ही. शांताराम यानी आपल्या राजकमल कलामंदिरमध्ये यशजींना कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून दिली. यश चोप्रा दिग्दर्शित 'दाग' (राजेश खन्ना व शर्मिला टागोर. १९७३) हा या बॅनरचा पहिला चित्रपट. डीडीएलजेच्या निर्मितीच्या वेळेस यशजींचा मोठा मुलगा आदित्यने चित्रपट दिग्दर्शनात पाऊल टाकले आणि यशराज फिल्म्सचा कारभार अंधेरी पश्चिमेकडील ओशिवरा येथे नेले. (कालांतराने तेथे अद्ययावत यंत्रणेसह भव्य स्टुडिओही उभारला.)

'डीडीएलजे'पूर्वी शाहरुख व काजोल जोडीचे 'बाजीगर ' व 'करण अर्जुन' रौप्य महोत्सवी यशस्वी होते, तर शाहरुखने यश चोप्रांच्या 'डर'मध्ये क.... क.... किरण असे सतत म्हणत साकारलेली खलवृत्तीची भूमिका रसिकांत प्रचंड लोकप्रिय झाली होती. 'बाजीगर'मधीलही त्याचे व्यक्तिमत्त्व खुनशीच होते.

याच पाश्वभूमीवर 'डीडीएलजे'तील त्याचा रोमॅन्टिझम कसा बरे स्वीकारला जाईल अशीच काहीशी शंका होती, पण 'डीडीएलजे' प्रदर्शित झाला आणि जणू सगळ्यांच्याच प्रश्नांना चोख उत्तर देत एक नवे पर्व सुरु झाले. अतिशय तजेलदार, एनर्जेटिक व जवळपास संपूर्ण पडदा व्यापून टाकणारा शाहरुख खान यात पाह्यला मिळाला. ( त्यानंतर २००४ सालचा आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'स्वदेश' आणि २००७ सालचा शिमित अमिन दिग्दर्शित 'चक दे इंडिया' वगळता तो याच प्रतिमेत अडकला हा भाग वेगळा) आणि काजोलची त्याला तितकीच खट्याळ, चुलबुळी, खोडकर साथ (यानंतरही अनेक चित्रपटात यांची ऑन स्क्रीन केमिस्ट्री जमली आणि व्यक्तिगत आयुष्यातही ते छान मित्र म्हणून ओळखले जाताना त्यांच्याबद्दल भलतंसलतं गॉसिप्स झाले नाही हे विशेष)

यासह अनेक कलाकारांतील जरा हटके नावे सांगायची, तर शाहरुखच्या मित्राच्या भूमिकेतील करण जोहर. तो त्याच वेळेस आदित्यचा सहाय्यकदेखील होता. तेव्हाचे दिग्दर्शनीय धडे त्याला उपयुक्त ठरलेत, तर यातील मंदिरा बेदीला आपण नंतर क्रिकेटच्या मैदानावर वा समालोचक म्हणून पाहिले. तेव्हा याच चित्रपटातील बडे बडे शहरो मे ऐसी छोटी छोटी बाते होती रहती है हा संवाद आठवला.

आनंद बक्षींच्या गीताना जतिन ललितचे संगीत आणि त्यातून आजही गोडवा जपून असणारी सुमधूर गाणी या चित्रपटाला तिसऱ्या पिढीत घेऊन आलीत. मेरे ख्वाबो में तुम आये....आनंद बक्षींनी चक्क चोवीस वेळा लिहिले तेव्हाच त्यात जान आलीय. यशराज फिल्म्सच्या परंपरेला साजेशीच अशी ही गाणी आहेत. तुझे देखा तो यह जाना सनम..., होगा गया है तुझको तो प्यार सजना... कोणतेही ऐका/पहा तल्लीन व्हा. नेत्रसुखही भरभरून आहे. झळझळीत मनोरंजनाचे युग तेव्हाच सुरू झाले. एमटीव्ही व डिस्कव्हरी वाहिन्या शहरी रसिकांची रूची बदलत होत्या आणि तेव्हाच मुख्य प्रवाहातील चित्रपट बदलू लागला.

हिंदी चित्रपटाचा अभ्यास करताना 'शोले'पूर्वीचा व नंतरचा असा भाग केला जातो. त्यात 'शोले' ते 'डीडीएलजे' आणि नंतर असाही एक प्रवास सुरू आहे म्हणूनच तर ही दखल... २० ऑक्टोबर आला की 'डीडीएलजे' हमखास आठवतो आणि त्यानिमित्ताने त्या दिवशी मराठा मंदिर चित्रपटगृहाला भेट देणं होते. तेव्हा काही वृत्तवाहिनीचे प्रतिनिधी कॅमेरा घेऊन आलेले भेटतात. म्हणजेच आजही या चित्रपटाची न्यूज व्हॅल्यू कायम आहे आणि हेदेखील एक यशच.

---

# शेतकऱ्यांच्या आशांना नवी पालवी



निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती संकटात सापडली की त्याचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीला बसतो. यंदा अलनिनोच्या प्रभावामुळे पडलेला पावसाच्या खंड आणि पावसाअभावी पिकांचे नुकसान, उत्पादनातील घट आणि उत्पन्नाची अनिश्चितता यामुळे शेतकऱ्यांसमोर कर्जफेडीचे मोठे आव्हान उभे राहते. अशा कठीण परिस्थितीत राज्य शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी घेतलेला पीक कर्जवसुलीला स्थगिती आणि पीक कर्जाच्या पुनर्गठनाचा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणारा आहे. हा निर्णय अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा उभे राहण्यासाठी संधी देणारा आहे. या निर्णयाची थोडक्यात माहिती

मदत व पुनर्वसन विभागाने २५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार खरीप हंगाम २०२६मध्ये ट्रिगर–१ अर्थात प्रथम कळ लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यात यवतमाळ जिल्ह्यातील १६ तालुक्यांचा समावेश आहे. याच अनुषंगाने सहकार विभागाशी संबंधित पीक कर्जाचे पुनर्गठन आणि शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या निर्णयामुळे बाधित तालुक्यांमधील शेतकऱ्यांना कर्जफेडीच्या तातडीच्या दबावातून काही प्रमाणात दिलासा मिळत आहे. विशेषतः खरीप हंगामातील पीक अपेक्षेप्रमाणे आले नाही किंवा उत्पन्न घटल्यामुळे विहित मुदतीत कर्जफेड करणे शक्य होत नसेल, तर अशा शेतकऱ्यांसाठी पीक कर्जाचे मध्यम मुदतीच्या कर्जात पुनर्गठन करण्याची तरतूद महत्त्वाची आहे. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक परिस्थिती सावरण्यासाठी अधिक नियोजनबद्ध पद्धतीने पुढे जाण्याची संधी मिळत आहे.

शासनाच्या निर्देशानुसार बाधित तालुक्यांमधील सन २०२६–२७च्या खरीप हंगामात घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची विहित मुदतीत परतफेड करू न शकणाऱ्या शेतकऱ्यांची संमती घेऊन कर्जाचे मध्यम मुदतीच्या कर्जात पुनर्गठन करण्यात येणार आहे. ही प्रक्रिया ३० एप्रिल २०२७पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश बँकांना देण्यात आले आहेत. त्याचबरोबर संबंधित शेतकऱ्यांना पुढील खरीप हंगामासाठी पीक कर्ज उपलब्ध करून देण्याबाबतही स्पष्ट निर्देश आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची पत टिकवून ठेवण्यास आणि आगामी हंगामाच्या तयारीसाठी आवश्यक आर्थिक पाठबळ मिळविण्यास मदत होत आहे.

शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती देण्याचा निर्णयही तितकाच महत्त्वाचा आहे. दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना कर्जवसुलीचा तगादा सहन करावा लागू नये आणि त्यांना शेतीच्या पुनर्नियोजनावर लक्ष केंद्रित करता यावे, हा या उपाययोजनांमागील महत्त्वाचा उद्देश आहे. या संपूर्ण प्रक्रियेत बँकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. या सवलतींचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी बँकांनी कार्यवाही सुरु केली आहे.

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे तसेच राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या समन्वयकांनी या शासन परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी होईल याची दक्षता घेण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. त्यामुळे संबंधित बँकांकडून पात्र शेतकऱ्यांना अनावश्यक अडचणी न आणता, निर्धारित मुदतीत कर्ज पुनर्गठनाची प्रक्रिया पूर्ण केली जात आहे.

जिल्हा प्रशासनानेही या निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीला प्राधान्य दिले असून जिल्हास्तरावर सातत्याने आढावा घेतला जात आहे. पीक कर्जाच्या पुनर्गठनासाठी बँकांकडून अडचणी निर्माण केल्या जात असल्यास किंवा कर्जवसुलीसाठी तगादा लावला जात असल्यास शेतकऱ्यांनी जिल्हा प्रशासनाकडे तक्रार करावी, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. यामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना आपली समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविण्यासाठी एक महत्त्वाचा मार्ग उपलब्ध होत आहे.

शासनाने जाहीर केलेल्या सवलतींची अंमलबजावणीत तळागळापर्यंत आहे. बँकांनीही पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज पुनर्गठनाचे प्रस्ताव वेळेत निकाली काढणे, वसुली स्थगितीच्या निर्देशांचे पालन करणे आणि पुढील खरीप हंगामासाठी कर्ज उपलब्ध करून देणे, या बाबींना प्राधान्य दिले आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनीही संबंधित बँकेशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे व संमतीची प्रक्रिया पूर्ण करण्याची गरज आहे.

दुष्काळाचे संकट मोठे असले, तरी शेतकऱ्यांना उभारी देण्यासाठी त्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. शेतकऱ्यांना दुष्काळाची मदत दिवाळीपूर्वी देण्याचे नियोजन सुरु आहे. शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून सावरण्यासाठी पीक कर्ज पुनर्गठन, कर्ज वसुलीला स्थगिती आणि आगामी हंगामासाठी पीक कर्जाची उपलब्धता या उपाययोजना समन्वयाने राबविल्या जात आहेत. शासन, बँका आणि जिल्हा प्रशासन हे एकत्रितपणे या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करत असल्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना नव्या हंगामासाठी आर्थिक आधार देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

पीक कर्ज पुनर्गठन आणि कर्ज वसुलीला स्थगिती या निर्णयाने शेतकऱ्यांना नक्कीच दिलासा दिला आहे. संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना पुन्हा सक्षम करण्यासाठी अशा उपाययोजना निश्चितच महत्त्वपूर्ण ठरत आहेत. पीक कर्ज पुनर्गठन आणि कर्ज वसुलीला स्थगिती दिल्याने शेतकऱ्यांच्या आशांना नवी पालवी फुटली आहे.

**–पवन राठोड,**
प्र.जिल्हा माहिती अधिकारी,
यवतमाळ

---

# आठवणीतला भोंडला...



लहानपणी अश्विन महिना आणि हस्त नक्षत्र लागले की आम्हा लहान मुलींना भोंडल्याचे वेध लागायचे. आमच्या शाळेत नवरात्रात एक दिवस ठरवून भोंडला व्हायचा, आमची फक्त मुलींची शाळा होती. भोंडला खेळायला अजूनच मजा यायची. ज्या दिवशी भोंडला असे त्या दिवशी नवीन ड्रेस शाळेत घालून यायला परवानगी असायची. आम्ही सगळ्या मुली छान लाँग फ्रॉक, शरारा घालायचो. मग फेर धरून नाचताना गोल गिरकी घेताना फार गंमत वाटायची.

मधल्या सुट्टीत डबा खाऊन झाला की सगळ्यांना शाळेच्या खालच्या अंगणात बोलवत असत. आमच्या शाळेतल्या बाई अंगणाच्या मधोमध मोठ्या हत्तीची रांगोळी काढत किंवा मग हत्तीच चित्र ठेवत. मग प्रत्येक इयत्तेनुसार प्रत्येक तुकडीच्या मुलींना हत्ती भोवती फेर धरायला सांगत. सोबत प्रत्येक वर्गाच्या बाईसुद्धा मुलींसोबत फेर धरायच्या.

हस्त नक्षत्राच प्रतीक म्हणजे हत्ती, हस्ताचा पाऊस म्हणजे परतीचा पाऊस, ढगांचा गडगडाट आणि विजांचे लखलखाट, हे नक्षत्र बहुतेक वेळेस नवरात्रात लागतं. त्यामुळे हत्तीच्या मूर्तीची किंवा चित्राची पूजा करून त्याला हार, फुले वाहून उदबत्ती लावून आणि जो काही प्रत्येकीने खाऊ आणला असेल त्याचा त्याला नैवेद्य दाखवून मग भोंडल्याला सुरवात करतात. मुख्य एक गंमत म्हणजे कोणी काय खाऊ आणलाय हे सांगायचं नसतं. तो लपवून ठेवायचा असतो. भोंडला संपल्यावर मग सगळ्यांनी खाऊ ओळखायचा आणि मग खायचा अस असायचं.

आमच्या शाळेत भोंडल्याची गाणी सुरू होत असत. ऐलमा पैलमा गणेश देवा माझा खेळ मांडू दे करीन तुझी सेवा... एक लिंबू झेलू बाई दोन लिंबू झेलू... आज कोण वार बाई आज कोण वार... कारल्याचा वेल लाव गं सुने लाव गं सुने मग जा आपल्या माहेरा माहेरा... आला माझा सासरचा वैद्य.. अक्कण माती चिक्कण माती अशी माती सुरेख बाई... अशी बरीचशी गाणी म्हणली जायची. त्यामुळे आजही मला ती सगळी गाणी तोंडपाठ आहेत.

या गाण्यातून सासर आणि माहेर या दोन्हीच वर्णन आहे. माहेर म्हणजे प्रत्येक स्त्रीचा जिव्हाळ्याचा विषय असतो. सासरच्या तक्रारी, लटका रुसवा या गाण्यांतून व्यक्त होतो. अस्स माहेर सुरेख बाई खेळाया मिळत, अस्स सासर द्वाड बाई... ही सगळी पारंपरिक गाणी आहेत.

फार पूर्वीच्या काळात मुलींची लवकर लग्न व्हायची. मग विरंगुळ्यासाठी हे सणवार आणि त्यात ही गाणी म्हणजे मनातलं बोलून व्यक्त होण्याची एकप्रकारची संधीच असायची. त्यातून ही गाणी निर्माण झाली असावी. आता काळासोबत सर्व बदललं मुली शिकल्या, स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या पण अजूनही भोंडला आणि भोंडल्याची गाणी म्हणत फेर धरून खेळायला खूप मजा येते.

यात एक सगळ्या मुलींचं आवडतं गाणं म्हणजे श्रीकांता कमलाकांता असं कसं झालं असं कसं वेडं माझ्या नशिबी आलं... एकदा वेड्याच्या बायकोने केल्या होत्या करंजा तिकडून आला वेडा त्याने डोकावून पाहिले होड्या होड्या म्हणून त्याने पाण्यात सोडल्या... श्रीकांता कमलाकांता असं कसं झालं.. अस कसं वेड माझ्या नशिबी आलं...

एकदा वेड्याच्या बायकोने केल्या होत्या चकल्या तिकडून आला वेडा त्याने डोकावून पाहिले बांगड्या बांगड्या म्हणून त्यांनी हातात घातल्या... श्रीकांता कमलाकांता असं कसं झालं असं कसं वेडं माझ्या नशिबी आलं...

एकदा वेड्याच्या बायकोने केले होते लाडू तिकडून आला वेडा त्याने डोकावून पाहिले, चेंडू चेंडू म्हणून त्यांनी खेळायला घेतले... श्रीकांता कमलाकांता असं कसं झालं असं कसं वेडं माझ्या नशिबी आलं...

का कोणास ठावूक, पण हे गाणं आमच्या सगळ्या मुलींना फार आवडायचं हे गाणं लागलं की आम्ही अजून उत्साहाने फेर धरायचो... शेवटी आड बाई आडोनी... आडाचं पाणी काढूनी... आडात पडला शिंपला आमचा भोंडला संपला... हे गाणं बोलून भोंडल्याची सांगता व्हायची.

शाळेत भोंडला संपला की सगळ्यांना अल्पोपहार मिळत असे आणि मग कार्यक्रमाची सांगता होत असे. हा झाला शाळेतला भोंडला याशिवाय मैत्रिणींकडे आणि बाकी बऱ्याच ठिकाणी भोंडला साजरा होत असे. भोंडल्याला बरेच ठिकाणी हादगा, भुलाबाई अस सुद्धा म्हणतात. सगळ्यांना गरबा, दांडिया माहीतच असेल पण किती जणांना भोंडल्याची गाणी येतात? ही आपली संस्कृती आहे आणि ती आपणच टिकवली पाहिजे. तरच पुढच्या पिढ्यांना याची माहिती होईल असं मला वाटतं.

**–केतकी देवधर विद्वांस,**
खोपोली, रायगड

# रायगड जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा

## खासगी डॉक्टरांच्या सेवेचा सन्मान



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाची आढावा बैठक शुक्रवारी (दि. १६) उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत जिल्ह्यात गेल्या ३० ते ४० वर्षे निःस्वार्थ भावनेने अंतर्गत रुग्णसेवा देणाऱ्या खासगी डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. जिल्हा परिषद सदस्या दिशा जाधव, खालापूर पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयेश गोसावी यांच्यासह अधिकारी, कर्मचारी बैठकीस उपस्थित होते.

बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये 'श्री गणेशा आरोग्याचा' अभियानांतर्गत १२७४ शिबिरे घेण्यात आली. तसेच सेवा संकल्प अभियान राबवून १४०० जन्म-मृत्यू दाखले निकाली काढण्यात आल्याची माहिती देण्यात आली. त्याचप्रमाणे आरोग्य सभापती मधुकर पाटील यांनी जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था आणखी बळकट करण्यासाठी ॲक्शन प्लॅन तयार करून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्याची सूचना केली. पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे यांनी तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी आपल्या विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालयांना भेटी देऊन तेथील परिस्थितीचा आढावा घेण्याबाबत आवश्यक सूचना केल्या.

यानंतर २७ ऑक्टोबर राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त कार्यक्रम व ३ नोव्हेंबर रोजी मॉप-अप राऊंड राबविण्याबाबत ठराव मंजूर करण्यात आला. तसेच उष्णतेच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एक वातानुकूलित कक्ष निर्माण करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. यानंतर जिल्ह्यात गेल्या ३० ते ४० वर्षे निःस्वार्थ भावनेने अंतर्गत रुग्णसेवा देणाऱ्या खासगी डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये पनवेल तालुक्यातील शिरढोण येथील डॉ. संदेश बहाडकर, साई येथील डॉ. हरिश्चंद्र भोईर, माणगाव येथील डॉ. एम. जी. मुल्ला आणि महाड तालुक्यातील दासगाव येथील डॉ. मोहन मेथा यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सत्कारमूर्तींनी रायगड जिल्हा परिषदेने त्यांच्या सेवेची दखल घेतल्याने प्रशासनाचे आभार व्यक्त केले.

## अंकुर फाउंडेशनचा अन्नदान उपक्रम उत्साहात

### जागतिक अन्नदान दिनानिमित्त सेवा



**माणगाव : प्रतिनिधी**

भुकेल्याला अन्न देणे हीच खरी ईश्वरसेवा आणि माणुसकीची शिकवण आहे, या उदात्त भावनेतून अंकुर फाउंडेशनच्या वतीने जागतिक अन्नदान दिनानिमित्त १६ ऑक्टोबर रोजी रा. जि. प. आदिवासी शाळा, देगाव, ता. माणगाव येथे अन्नदान उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांना पोटभर भोजन देण्यात आले. या सेवाभावी उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.

अंकुर फाउंडेशनच्या वतीने गेल्या १२ वर्षांपासून दुर्गम भागातील आदिवासी आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी तसेच त्यांच्या पालकांसाठी अन्नदानाचा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. सामाजिक बांधिलकी जपत सुरू असलेल्या या उपक्रमातून प्रेम, आपुलकी, माणुसकी आणि सेवाभावाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले जात आहे.या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, शाखा माणगावचे अध्यक्ष संजय पाटोळे, देगाव आदिवासी वाडी शाळेचे मुख्याध्यापक ध्रुवसिंग पावरा, उपशिक्षक बोधले सर, अंगणवाडी ताई व मदतनीस तसेच देगाव आदिवासी वाडी ग्रामस्थ मंडळाचे सदस्य उपस्थित होते. अंकुर फाउंडेशनचे अध्यक्ष उदय चव्हाण, सचिव चिंतामणी बटवले, उपाध्यक्ष प्रवीण वारे आणि कार्याध्यक्ष अमित खैरे यांनी स्वतः उपस्थित राहून विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना प्रेमाने भोजन वाढले. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुललेले हास्य, त्यांच्या डोळ्यांतील आनंद आणि भोजनानंतर दिसणारे समाधान उपस्थितांच्या मनाला स्पर्शून गेले.

अन्नदान म्हणजे केवळ अन्न देणे नव्हे, तर गरजूंच्या जीवनात आनंदाचे क्षण निर्माण करणे होय. समाजातील वंचित आणि गरजू घटकांना मदतीचा हात देऊन त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे, हीच खरी समाजसेवा असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# माजी विद्यार्थ्यांनी जपली सामाजिक बांधिलकी

*तळा माध्यमिक शाळेला १४ सीलिंग फॅन भेट*



**तळा : प्रतिनिधी**

श्री गोपीनाथ महादेव वेदक विद्यामंदिर, तळा येथील माजी विद्यार्थी कै. प्रतीक नंदकुमार सुतार याच्या जन्मदिनाचे औचित्य साधून त्याच्या दहावीच्या बॅचमधील मित्रपरिवाराने गो. म. वेदक विद्यामंदिर शाळेला १४ सीलिंग फॅन भेट देऊन सामाजिक बांधिलकी जपली. मित्राची स्मृती जपत शाळेच्या गरजेसाठी दिलेल्या या भेटीमुळे शाळेच्या माजी विद्यार्थ्यांच्या ऋणानुबंधांचे भावस्पर्शी दर्शन घडले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कै. प्रतीक सुतार याच्या प्रतिमेला संस्थेचे पदाधिकारी व उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी माजी विद्यार्थी जयेश शिंदे आणि चैतन्य पाटील यांनी कै. प्रतीकच्या आठवणींना उजाळा दिला.आपल्या मित्राच्या स्मृती जपत शाळेसाठी उपयुक्त वस्तू भेट देण्याचा स्तुत्य उपक्रम राबविणाऱ्या विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने आभार मानण्यात आले.

कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी महेंद्र कजबजे, पुरुषोत्तम मुळे, मुख्याध्यापक महादेव लोकरे व माजी विद्यार्थी डॉ. श्रद्धा कवळे, धीरज जयस्वाल, भावेश म्हात्रे, योगेश सुतार, योगिता सुतार, किशोरी रामाणे यांच्यासह शिक्षक व माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास वावेकर यांनी केले. मित्राच्या आठवणींना केवळ शब्दांत न जपता शाळेच्या उपयोगी पडणारी भेट देऊन माजी विद्यार्थ्यांनी मैत्री, कृतज्ञता आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम घडवून आणला आहे.



**मुरुड : पीटसई येथील अशोक ल. लोखंडे विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.**

# चौकमध्ये लिंगभेद समानतेवर चित्रकला स्पर्धा

**चौक : प्रतिनिधी**

चौक येथील सरनोबत नेताजी पालकर विद्या मंदिरात मॅजिक बस इंडिया फाउंडेशनच्या वतीने लिंगभेद समानता विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत शाळेतील ९२ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून आणि रंगांच्या माध्यमातून मुलगा-मुलगी समानता, स्त्री-पुरुषांचे समान हक्क, शिक्षणातील समान संधी आणि समाजातील लिंगभेद दूर करण्याचा प्रभावी संदेश दिला.

विद्यार्थ्यांमध्ये लिंगभेदाबाबत जागरूकता निर्माण करणे, मुलगा आणि मुलगी यांच्यात कोणताही भेदभाव न करता दोघांनाही समान संधी मिळण्याची जाणीव करून देणे, तसेच समानतेवर आधारित समाजनिर्मितीसाठी प्रोत्साहित करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. चित्रकलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी सामाजिक प्रश्नांवरील आपले विचार सर्जनशील पद्धतीने मांडले. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शोभा पाटील, समितीचे सचिव योगेंद्र शहा, शाळेचे मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापक तसेच खालापूर पंचायत समितीच्या सदस्या पाटील उपस्थित होत्या. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत या सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण विषयावर त्यांनी चित्रांच्या माध्यमातून व्यक्त केलेल्या विचारांचे विशेष कौतुक केले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुलगा आणि मुलगी हे दोघेही समान असून शिक्षण, खेळ, करिअर आणि जीवनातील प्रत्येक क्षेत्रात दोघांनाही समान संधी मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्रत्येक व्यक्तीचा आदर करणे, एकमेकांच्या हक्कांचा सन्मान राखणे आणि समानतेची भावना दैनंदिन जीवनात रुजवणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

शाळांमध्ये अशा प्रकारच्या चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा आणि जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन केल्याने विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच सकारात्मक विचारसरणी विकसित होते. तसेच समाजातील चुकीच्या रूढी, असमानता आणि भेदभाव दूर करण्यासाठी जागरूक नागरिक घडण्यास मदत होते, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.







**मोहोपाडा : येथील अचानक मित्र मंडळाच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त दुर्गामाता देवीची स्थापना करण्यात आली असून देवीच्या मंडपात आकर्षक सजावट करण्यात आली आहे.**

# माथेरानमधील अजगराला सोडले जंगलात



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमधील इंदिरा गांधीनगर येथील लोकवस्तीत सुशांत ढेबे यांच्या घराशेजारी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास सुमारे आठ ते नऊ फूट लांबीचा अजगर जातीचा साप आढळून आला. अजगर दिसताच सुशांत ढेबे यांनी तातडीने चंद्रकांत सुतार यांना फोन करून माहिती दिली. त्यानंतर समित्र ग्रुपचे तरुण त्वरित घटनास्थळी दाखल झाले. बॅटरीच्या प्रकाशात सावधगिरीने प्रयत्न करून अजगराला सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आणि जंगलात सोडण्यात आले.

या मोहिमेत सुशांत ढेबे, योगेश देशमुख, प्रमोद पाटील, ललित पांगसे, संकेत निचिदे, धीरज कदम, सुरेश शिंदे, राजेंद्र देशमुख, सुमित परीट, स्वप्नील गोसावी आणि महेश जाबरे यांनी महत्त्वपूर्ण मदत केली.

अजगर जातीचा भला मोठा साप हा बिनविषारी सर्प असून पर्यावरणाचा समतोल राखण्यात त्याची महत्त्वाची भूमिका असते. अन्नाच्या शोधात वन्यजीव मानवी वस्तीत येऊ शकतात. समित्र ग्रुपच्या तरुणांनी यापूर्वीही इंदिरा गांधी नगर परिसरात अनेक विषारी व बिनविषारी सर्पांना सुरक्षितपणे पकडून जंगलात सोडले आहे.

यावेळी देखील अजगर जातीच्या सापाला सुरक्षितपणे जंगलात सोडण्यात आल्याने कड्यालगत राहणाऱ्या नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. येथे समित्र ग्रुपच्या तरुणांनी दाखवलेली तत्परता, धाडस व वन्यजीवांविषयीची संवेदनशीलता कौतुकास्पद असून त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिशीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे महसूल दप्तरी वर्णन केलेल्या मिळकतीचे मालकांनी सदर मिळकतीचा शोध घेऊन त्याचे मालकी हक्काचे पडताळणी करून शोध अहवाल व मालकी हक्काचा दाखला देण्याची विनंती केली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. चिरवत, ता. पनवेल, जि. रायगड.**

| नाव | गट नं. व उपविभाग | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|---|
| श्रध्दा प्रकाश भिसे | 16 | 3/ड/1/ब/5/अ | 0-13.00 | 0=53 |
| | | | पैकी 0.03.00 | |
| | 16 | 4/क/5/ब | 0-66.80 | 10=45 |

सदरहू मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनीय कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकतीचे वरीलप्रमाणेचे मालकी हक्कांची पडताळणी पूर्ण करु व मिळकत बोजारहीत असल्याचे स्पष्ट झाल्यास त्याबाबत मालकी हक्काचा दाखला देण्याची तजविज करण्यात येईल. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल,**
**दि. १८/१०/२०२६**

**सही/-**
**(ऋत्विक. एस. लाड)**
**वकील.**
**पत्ता : १०४, आदित्य विहार को. ऑप. हौसिंग सोसायटी, पहिला मजला, महात्मा फुले मार्ग, पनवेल ४१० २०६, जि. रायगड. मो. नं. ७०२१५११३८७.**
**इमेल. rutwiklad03@gmail.com**

# श्रीवर्धन येथील कुसुमादेवी



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहराला लागूनच असलेल्या एका जंगलामध्ये कुसुमादेवी मंदिर आहे. मंदिराच्या चारही बाजूला अतिशय घनदाट जंगल आहे. श्रीवर्धन शहरालगत असलेल्या गाय गोठण परिसरामधून या मंदिराकडे जाण्यासाठी आता रस्ता झाला आहे. या अगोदर जवळजवळ दोन ते तीन किलोमीटर पायी चालत जावे लागत असे. रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून या ठिकाणी रस्ता तयार करण्यात आला असून आता ज्या ठिकाणी रस्ता संपतो तेथून दोन मिनिटाच्या अंतरावरच मंदिरात जाता येते. श्री महाकाली, श्री महालक्ष्मी आणि श्री महासरस्वती अशा तीन शक्तींचे मिळून हे कुसुमादेवी मंदिर श्रीवर्धनजवळ आहे. कुसुमादेवीचे नित्य पुजारी श्रीवर्धन शहरात असलेल्या सोमजाई देवीचे पुजारी गुरव हेच पूजा करतात, तर नवरात्रोत्सवाच्या काळात या ठिकाणी घटी म्हणून एक ब्राह्मण जोडपे वस्तीसाठी राहते. नवरात्राच्या पहिल्या दिवशी घटस्थापना करणे, त्यानंतर शेवटच्या दिवशी होम-हवन करून नवरात्रोत्सवाची सांगता करण्यात येते. श्रीवर्धन शहरातून प्रत्येक ठिकाणचे भजन मंडळ रोज रात्री भजन करण्यासाठी या ठिकाणी जात असते. त्या ठिकाणी वस्तीसाठी असणारे ब्राह्मण कुटुंब रोज पाठाचे वाचन करणे, देवीवर अभिषेक करणे तसेच नैवेद्य तयार करून रोज नैवेद्य देवीला दाखवणे हे नऊ दिवस करत असतात. चैत्र महिन्याच्या शुद्ध तृतीयेला या ठिकाणी चैत्र गौरीच्या दिवशी यात्रा भरवली जाते. संपूर्ण नवरात्रामध्ये श्रीवर्धन तालुक्यातील अनेक भाविक देवीच्या दर्शनासाठी मंदिरामध्ये येत असतात.

काही वर्षांपूर्वी मंदिरामध्ये वीज जोडणी देखील नव्हती. परंतु काही वर्षांपूर्वी या ठिकाणी वीज जोडणी देण्यात आलेली आहे. मंदिरामध्ये पाण्याची सोय करण्यासाठी लक्ष्मीनारायण मंदिराच्या शेतजमिनीमध्ये विहीर खणून त्या विहिरीचे पाणी मंदिरापर्यंत नेण्यात आले आहे. या मंदिराबाबत एक आख्यायिका सांगितली जाते. श्रीवर्धन शहरात असलेली सोमजाई देवी व कुसुमादेवी या बहिणी असून श्रीवर्धन शहरात असलेले भैरवनाथाचे मंदिर भैरवनाथ त्यांचा भाऊ आहे. सोमजाई देवी व कुसुमादेवी या दोन बहिणींमध्ये भांडण झाल्यामुळे कुसुमादेवी जाऊन जंगलामध्ये राहिली व त्या ठिकाणी तिचे मंदिर बांधण्यात आले.

यावर्षी पाऊस कमी झाल्यामुळे मंदिराकडे जाताना पाण्याचा अडथळा निर्माण होत नाही, नाहीतर अनेक वेळा ढोपरभर पाण्यातून मंदिरापर्यंत पोहचावे लागते. लवकरच अपूर्ण राहिलेला रस्तादेखील पूर्ण करून देवीच्या मंदिरापर्यंत रस्ता होईल, अशी आशा भाविकांमधून व्यक्त होताना पाहायला मिळते.

## माणगावात दुकान फोडून दोन लाखांची चोरी; सराईत गुन्हेगाराला अटक

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील मुंबई-गोवा महामार्गावरील ग्लोबल बर्थ वेअर अँड इलेक्ट्रिक या दुकानाचे पत्रे उघडून तब्बल दोन लाख सात हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याच्या प्रकरणाचा माणगाव पोलिसांनी छडा लावला आहे. याप्रकरणी आकाश चंद्रकांत मोरे याला १६ ऑक्टोबर रोजी अटक करण्यात आली. आरोपीविरुद्ध यापूर्वी विविध पोलीस ठाण्यांमध्ये सात गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार ७ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून ८ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजेपर्यंतच्या कालावधीत ही चोरी झाली होती. दुकानाचे मालक निलेश शांतीलाल पटेल यांनी याप्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.चोरट्याने दुकानाच्या शटरचे पत्रे उघडून अल्ट्रावोल्ट कंपनीच्या लाईट फिटिंगच्या वायरचे १९ बंडल तसेच विविध कंपन्यांचे पाण्याचे मिक्सर कॉक असा एकूण दोन लाख सात हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला होता. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती आंधळे यांनी तपासाची जबाबदारी पोलीस उपनिरीक्षक जाधव यांच्याकडे सोपवली.

पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत या चोरीचा उलगडा केला आणि आकाश चंद्रकांत मोरे याला १६ ऑक्टोबर रोजी अटक केली. आरोपीविरुद्ध यापूर्वी विविध पोलीस ठाण्यांमध्ये सात गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे. त्यामुळे या कारवाईला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ही कारवाई यशस्वी करण्यासाठी पोलीस शिपाई मुंढे, शिर्के, पठाण आणि शेकडे यांनी भूमिका बजावली.


एम. व्ही. टी. व्ही.

**पाहिजेत : दैनंदिन ठेव प्रतिनिधी**

**एम.व्ही.टी.व्ही. सहकारी पतपेढी लि., शाखा : पनवेल**

४७ वर्षांची सहकाराची परंपरा आणि ६०,०००+ सभासदांचा विश्वास. ३५० कोटींहून अधिक व्यवसाय आणि ६ शाखांचे विस्तृत जाळे.

पनवेल व परिसरासाठी दैनिक ठेव संकलन करणाऱ्या प्रामाणिक आणि मेहनती उमेदवारांची आवश्यकता.

**पात्रता :** किमान १० वी किंवा १२ वी उत्तीर्ण
**वयोमर्यादा :** वय वर्षे ६० पर्यंत.
**अनुभव :** पतपेढी किंवा बँकिंग क्षेत्रातील अनुभवी उमेदवारांना व स्थानिकांना प्राधान्य.
**फायदे :** आकर्षक कमिशन व प्रगतीची संधी.

इच्छुक उमेदवारांनी आपला बायोडाटा व आवश्यक कागदपत्रांसह प्रत्यक्ष भेट द्यावी.

**पत्ता :** शॉप नं - ३, नील आंगण अपार्टमेंट, प्लॉट नं २९, सेक्टर - १९, न्यू पनवेल, ४१० २०६.
**मोबाईल :** ८६५७४७३५७३/९७६८८८०३१३
**Email ID :** umesh@mvtvccs.com
**वेळ :** सकाळी ९:३० ते ५:३०

# नमुंमपा कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड

## ४५ हजारांचा बोनस मंजूर




**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचारी, शिक्षक तसेच कंत्राटी आणि आशा स्वयंसेविकांना दिवाळीनिमित्त प्रत्येकी ४५ हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्याचा ठराव महासभेत मंजूर करण्यात आला आहे. यंदा वर्गवारी न करता सरसकट सर्वांना समान अनुदान देण्यात येणार असून त्यामुळे हजारो कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या महासभेत सभागृहनेते सागर नाईक यांनी सानुग्रह अनुदानाचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली. चर्चेदरम्यान विविध पक्षांच्या सदस्यांनी आपली मते मांडली. अनुदानात वाढ करण्याची मागणी करत शिवसेनेच्या वतीने ज्येष्ठ नगरसेवक शिवराम पाटील यांनी सर्व कर्मचाऱ्यांना ५० हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्यात यावे, अशी सुधारित सूचना मांडली. तसेच पालिका प्रशासनाने कोणत्याही जाचक अटी न लावता, सेवेत असलेल्या आणि १४ गावांतून आलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना या अनुदानाचा लाभ तातडीने द्यावा, अशी मागणी सदस्यांनी केली.

नवी मुंबई महानगरपालिका दरवर्षी आपल्या कर्मचाऱ्यांना चांगल्या पद्धतीचे सानुग्रह अनुदान देऊन प्रोत्साहन देते. महापौरांच्या उपस्थितीत सर्वपक्षीय संमतीने हा निर्णय मंजूर करण्यात आला. दरम्यान, पालिका क्षेत्रातील २६ आरोग्य केंद्रांत एनयूएचएम अंतर्गत डेटा एन्ट्री कम क्लार्क या पदावर कर्मचारी कंत्राटी तत्त्वावर कार्यरत आहेत. हे सर्व कर्मचारी स्थानिक नवी मुंबईकर आहेत. या कर्मचाऱ्यांना गेल्या तीन वर्षांपासून पालिकेकडून एक रुपयाही बोनस देण्यात आलेला नाही. यंदा मात्र या कर्मचाऱ्यांनाही बोनस मिळेल, असे आश्वासन सभागृहनेते सागर नाईक यांनी दिले.

> *महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांची यंदाची दिवाळी अत्यंत आनंदात आणि गोड साजरी होणार आहे. पालिका कर्मचाऱ्यांना ४५ हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान (बोनस) देण्यासंदर्भात सभागृहात सर्वपक्षीय संमतीने मंजुरी दिली आहे.*
> **-सुजाता पाटील, महापौर, नवी मुंबई**



# रिसमध्ये दुर्गामाता मंदिरात नवरात्रोत्सव

## नगरसेवक परेश ठाकूर यांनी घेतले दर्शन ; आयोजकांकडून सन्मान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रिस-मोहोपाडा येथील मातोश्री संकुलातील दुर्गामाता मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेला 'गौरव नवदुर्गांचा' हा विशेष सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या आठ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. भक्तिमय वातावरणात महिलांच्या कार्याचा गौरव, समाजसेवेचा सन्मान आणि नारीशक्तीला सलाम अशा उत्साही वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला.



दांड-रसायनी रोडवरील रिस-मोहोपाडा येथील दुर्गामाता मंदिरात स्वर्गीय बहिणाबाई उकर्डाजी दुधे यांच्या स्मरणार्थ नवरात्रोत्सव साजरा केला जातो. दुधे परिवाराच्या वतीने गेल्या २६ वर्षांपासून ही धार्मिक आणि सामाजिक परंपरा अखंडपणे जपली जात आहे. नवरात्रोत्सवाच्या पाचव्या माळेनिमित्त नगरसेवक परेश ठाकूर यांनी मंदिरात उपस्थित राहून दुर्गामातेचे दर्शन घेतले. त्यानंतर देवीची आरती करण्यात आली. कार्यक्रमाला पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक अनिल भगत, बिल्डर असोसिएशनचे माजी अध्यक्ष प्रकाश बाविस्कर, बामरे, प्रसिद्ध उद्योजक तुकाराम दुधे, गणेश मुकादम, रेश्मा कुरूप यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. दुधे बिल्डर आणि साहस फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सन्मान सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात आला.

यामध्ये शिक्षण क्षेत्रातील प्रा. डॉ. अंगळ सुंदर, वैद्यकीय सेवेसाठी डॉ. सीमा नारायण पाईकराव, वारकरी संप्रदायातील पूनम पांडुरंग राऊत, कृषी क्षेत्रातील सुजाता किरण माळी यांच्यासह जनाबाई विठ्ठल मुंढे, शेवंताबाई दत्तात्रय ठोंबरे, ललिता अनंत दळवी आणि सुमा सिल्वाराजन या महिलांचा सन्मान करण्यात आला. महिलांनी विविध क्षेत्रांत केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांच्या सामाजिक योगदानाला प्रोत्साहन देणे तसेच त्यांच्या कर्तृत्वातून इतर महिलांना प्रेरणा मिळावी हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. महिलांच्या कार्याचा सन्मान करून समाजात नारीशक्तीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. दुधे परिवाराचा नवरात्रोत्सव केवळ धार्मिक कार्यक्रमांपुरता मर्यादित नसून त्याला समाजसेवेची भक्कम जोड आहे. 'अन्नदान हेच श्रेष्ठदान' ही भावना जपत २६ वर्षांपासून गोरगरीब आणि गरजू व्यक्तींना अन्नदान केले जाते. वृद्धाश्रमांनाही मदतीचा हात दिला जातो. नवरात्रोत्सवाच्या काळात मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात येते.

उत्सवादरम्यान दररोज दुर्गासप्तशती पारायण, हरिपाठ, भजन आणि आरती अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. ग्रामीण भागातील कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे धार्मिक परंपरेचे जतन करण्याबरोबरच स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन देण्याचे कामही उपक्रमातून केले जात आहे. दुर्गामातेची भक्ती, अन्नदानातून समाजसेवा व कर्तृत्ववान महिलांचा सन्मान या त्रिसूत्रीमुळे रीस येथील नवरात्रोत्सवाला सामाजिक बांधिलकीची विशेष जोड मिळाली आहे.

# 'इन्फिनिटी'च्या वर्धापन दिनानिमित्त विशेष विद्यार्थ्यांसोबत गरबा उत्सव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथे इन्फिनिटी फाउंडेशनच्या ११व्या वर्धापन दिनानिमित्त डॉ. नंदकुमार जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक दिव्यांग मुलांच्या विशेष शाळेच्या संयुक्त विद्यमाने गरबा उत्सव व शिक्षक सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका शिवानी घरत उपस्थित होत्या. तसेच इन्फिनिटी फाउंडेशनचे अध्यक्ष आयुफ अकुला, सल्लागार अक्षय चितळे आणि महिला व बालकल्याण सचिव शीतल गाडगे यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात विशेष शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याला समान सन्मान, प्रोत्साहन आणि आनंदाचा अनुभव मिळावा तसेच समाजात सर्वसमावेशकतेची भावना दृढ व्हावी हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. विद्यार्थ्यांनी गरबा नृत्याचा आनंद घेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी बोलताना नगरसेविका शिवानी घरत म्हणाल्या की, अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे समाजात सर्वसमावेशकतेला प्रोत्साहन मिळते. विशेष विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी अशा कार्यक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

सर्व विशेष विद्यार्थ्यांना मेडल देऊन सन्मानित केल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हसू भावस्पर्शी होते. या सोहळ्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व सर्वांगीण विकासासाठी योगदान देणाऱ्या १९ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. इन्फिनिटी फाउंडेशनच्या ११व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित उपक्रमातून विशेष विद्यार्थ्यांप्रति आपुलकी, समानतेची भावना आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कार्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

# नवी मुंबईत बंगाली असोसिएशनतर्फे शारदोत्सव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई बंगाली असोसिएशनतर्फे ४७व्या शारदोत्सवाचे आयोजन १६ ते २० ऑक्टोबरदरम्यान वाशी येथील सिडको प्रदर्शन केंद्रात करण्यात आले आहे. 'शारदीय फ्रॉम सोल टू सॉईल' ही यंदाची संकल्पना असून बंगाली संस्कृती, भक्ती, परंपरा आणि संगीताचा अनोखा संगम या उत्सवात अनुभवता येणार आहे.

उत्सवात पारंपरिक पूजा विधी, दररोज ७०० ते ८०० भाविकांसाठी महाभोग, बॉलिवूड व टॉलिवूड कलाकारांची सादरीकरणे, पारंपरिक फॅशन शो, धुनुची नृत्य तसेच शंखध्वनी आणि उलूध्वनी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. बंगाली मिठाई, फुचका, झालमुडी, पारंपरिक साड्या, दागिने आणि हस्तकला वस्तूही आकर्षण ठरणार आहेत. गंगेच्या मातीपासून साकारलेली १३ फूट उंचीची पर्यावरणपूरक दुर्गामूर्ती हे उत्सवाचे प्रमुख आकर्षण असेल, अशी माहिती असोसिएशनचे सरचिटणीस सोमनाथ चॅटर्जी यांनी दिली.



नवीन पनवेल : अस्मिता कला, क्रीडा आणि सांस्कृतिक मित्र मंडळाने सीकेटी विद्यालयाच्या मैदानात देवीची प्रतिष्ठापना केली आहे. यावेळी जगदीश घरत, नगरसेविका डॉ. अस्मिता घरत, श्रीधरशेठ भगत, राजूशेठ भगत.



तनिषा को-ऑप सोसायटी, करंजाडे



## दुर्गामाता दौड (माळ सातवी)

पनवेल : शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानकडून शनिवारी पनवेल येथील विचुंबे येथून श्री दुर्गामाता दौड काढण्यात आली. यावेळी लहानग्यांपासून ज्येष्ठही श्री दुर्गामाता दौडमध्ये उत्साहाने सहभागी झाले होते.

## नवरंग
### रंग राखाडी



माजी उपमहापौर चारुशीला घरत व पनवेल महानगरपालिका कर्मचारी



फुंडे हायस्कूल शिक्षिका वृंद, उरण



गव्हाण-कोपर हायस्कूल शिक्षिका वृंद



दापोली-पारगाव हायस्कूल शिक्षिका वृंद, पनवेल



जासई हायस्कूल शिक्षिका वृंद, उरण

# खोपोलीतील स्वागत कमान अखेर हटवली





**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील हायको कॉर्नरवरील स्वागत कमान तकलादू झाली होती. अशा परिस्थितीत रहदारीच्या या मुख्य रस्त्यावर कमान कोसळली असती तर वित्त हानी झालीच असती; त्यासोबतच जीवित हानीही झाली असती. ही कमान नगरपालिका प्रशासनाने तांत्रिक सर्वेक्षण करून व योग्य संसाधने वापरून लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांच्या उपस्थितीत पाडून टाकली.

जवळपास वीस वर्षाच्या कालावधीत ही आरसीसी पद्धतीने उभारलेली कमान तोडण्याची वेळ आली, ती त्या कमानीच्या उभारणीत असलेल्या त्रुटींमुळे. ही तोड कारवाई शुक्रवारी रात्रीच्या वेळेस रहदारी कमी झाल्यावर करण्यात आली.

यावेळी नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, मुख्याधिकारी पंकज पाटील यांच्यासह पालिकेतील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. नागरिकांनी या तोड कारवाईचे स्वागत केले आहे.

# ताम्हिणी घाटात इंधनवाहू टँकर उलटला

## सुदैवाने दुर्घटना टळली!

**माणगाव : बातमीदार**

पुण्याहून श्रीवर्धनच्या दिशेने जाणारा इंधनवाहू टँकर ताम्हिणी घाटात रस्त्याच्या कडेला पलटी झाल्याची घटना गुरुवार, १५ ऑक्टोबर रोजी घडली. टँकरचे ब्रेक निकामी झाल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. सुदैवाने या अपघातात टँकरचालक सुनील कुमार सुखरूप बचावले असून मोठी दुर्घटनाही टळली आहे.

एमएच १२ वाय ४६४२ क्रमांकाचा टँकर पुण्याहून श्रीवर्धनच्या दिशेने जात होता. ताम्हिणी घाटातून प्रवास सुरू असताना अचानक टँकरचे ब्रेक निकामी झाले. त्यामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि टँकर रस्त्याच्या कडेला पलटी झाला. अपघातग्रस्त टँकरमध्ये ज्वलनशील इंधन असल्याने आग लागण्याची किंवा इंधनगळती होण्याची शक्यता होती. घटनेची माहिती मिळताच माणगाव वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आवश्यक कार्यवाही सुरू केली. टँकर सुरक्षितपणे बाजूला करण्यासाठी क्रेन बोलावण्यात आली तसेच अग्निशमन दलालाही घटनास्थळी पाचारण करण्यात आले. या मदतकार्यात सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था आणि कोलाड-रोहा येथील रेस्क्यू टीमने सहभाग घेतला.



# वाडगाव येथील शिबिरात १५० जणांची मोफत नेत्र तपासणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथे ग्रामपंचायत वाडगाव, लायन्स हेल्थ फाउंडेशन आणि सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल, चोंढी यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात एकूण १५० नागरिकांची नेत्रतपासणी करण्यात आली असून त्यापैकी १७ रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली.



वाडगाव येथील कुणबी मराठा समाज मंदिरात आयोजित या शिबिरामध्ये नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. मोतीबिंदू तसेच तिरळेपणा यांसारख्या नेत्रविकारांचे निदान करून आवश्यक उपचार व शस्त्रक्रियेसाठी रुग्णांची निवड करण्यात आली. महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत पात्र रुग्णांना मोफत उपचारांचा लाभ मिळणार असल्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना दिलासा मिळाला आहे.

वाडगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अलिबाग तालुकाध्यक्ष जयेंद्र भगत यांच्या विशेष पुढाकाराने आणि माजी सरपंच तथा विद्यमान ग्रामपंचायत सदस्या सरिता भगत यांच्या सहकार्याने हे शिबिर घेण्यात आले. ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेत नेत्रतपासणी व उपचार उपलब्ध व्हावेत तसेच आर्थिक अडचणींमुळे कोणालाही उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. या उपक्रमासाठी डॉ. सुभाष म्हात्रे यांचे विशेष सहकार्य लाभले. शिबिराच्या आयोजनात डॉ. प्रतीक कणसे तसेच सहकारी राहुल घरत, केतकी भगत आणि प्रचिती किती यांनी परिश्रम घेतले.

यावेळी माजी सरपंच सीताराम भगत, माजी उपसरपंच नरेश थळे, प्रसाद पाटील, सरिता भगत, नीलम थळे, रुपाली पाटील, शुभांगी भगत, संतोष बोले, जयेंद्र भगत, रमेश भगत, भास्कर भगत, कुमार थळे, केशव पाटील, संतोष भगत, ग्रामपंचायत अधिकारी रीना वर्तक, सुरेश भगत, हेमंत लाखण, सुयोग ठाकूर, विनय भगत, महिला मंडळाच्या अध्यक्ष अंकिता गिजे आदी उपस्थित होते. सुनील थळे यांनी सूत्रसंचालन केले.

# आमदार अनिकेत तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना अन्नदान

**पेण : प्रतिनिधी**

खारपाडा येथे कै मोरेश्वर भगत शैक्षणिक सार्वजनिक वाचनालय आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या माध्यमातून रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत व वडमालवाडी येथे राजिप शाळेत आमदार अनिकेत तटकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी अन्नदान कार्यक्रम झाला.



यावेळी पेण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष दयानंद भगत, खारपाडा माजी सरपंच रश्मी भगत, माजी ग्रामपंचायत सदस्य सुनील पाटेकर, सदस्य अनिता भगत, माजी उपसरपंच नितेश घरत, मालती म्हात्रे, हभप नारायण पाटील, हभप गणपत पाटील, ज्येष्ठ नेते कृष्णा ठाकूर, युवा नेते प्रशांत पाटील, युवक नेते रोशन घरत, मोरेश्वर भगत शैक्षणिक संस्था पदाधिकारी सीता पवार, वैशाली भगत वाचनालय सदस्य देवराम घरत, वडमालवाडी राष्ट्रवादी काँग्रेस शाखा अध्यक्ष माजी उपसरपंच मच्छिन्द्र सवार कृष्णा सवार, मुख्याध्यापक नरेंद्र भोईर, सौ भोईर तसेच ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोरेश्वर भगत वाचनालयाचे सचिव कैलास रुठे, मुख्याध्यापक प्रवीण पाटील, प्रगती नाईक दिनकर पाटील, ज्योती पाटील उपस्थित होते. यावेळी खारपाडा ग्रामस्थ यांच्याकडून आमदार अनिकेत तटकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# बेलोशी ग्रामपंचायत हद्दीतील विविध कामांचे लोकार्पण





**रेवदंडा : प्रतिनिधी**

बेलोशी ग्रामपंचायत हद्दीतील वावे ते सागवाडीमधील विविध कामांचा लोकार्पण सोहळा नवरात्र उत्सवाचे निमित्ताने उत्साहात झाला.

या प्रसंगी वावे ते महाजने रस्ता काँक्रिटीकरणाचे काम चांगल्या दर्जाचे झाल्याचे सांगून लवकरच सांबरकुंड धरण तसेच गेल इंडियामार्फत पेझारी-पोयनाड मार्ग मार्गी लागेल याची ग्वाही देतानाच कुदे गावापर्यंत सर्वागीण विकासासाठी कबिध्द असल्याचे सुतोवाचे आमदार महेंद्र दळवी यांनी उपस्थितांना संबोधित करताना केले.

बेलोशी ग्रा.प. हद्दीत पंचायत समिती सदस्य संतोष निगडे यांचे वतीने वावे येथे १०० के.व्ही. ट्रान्सफार्मर, वावे नवीन वसाहत कॉंक्रिट रस्ता, श्री राम चौक सुशोभिकरण, वावे येथील छोटा साकव तसेच सागवाडी येथील कालकाई देवी मंदिर सुशोभिकरण व स्वागत कमान आदी विविध कामांचा लोकार्पण सोहळा १५ ऑक्टोबर रोजी सायकांळी सहा वाजता आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमास आमदार महेंद्र दळवी यांच्यासह जि.प.सदस्य अनंत गोंधळी, पंचायत समिती सभापती भाग्यता पाटील, सदस्य संतोष निगडे, शिवसेना नेते सुरेश म्हात्रे, बेलोशी ग्रा.प. माजी उपसरपंच शालिनी निगडे, चिचोंटी ग्रा.प.माजी सरपंच बाबुराव पाटील, वरंडे ग्रा.प. माजी सरपंच सुधीर चेरकर, जयवंत थळे, अनिता थळे, जेष्ठ कार्यकर्ते व्दारकानाथ गुंड, सदानंद थळे, हरिश्चंद्र भोपी, पुथ्वीराज पाटील, अजय गायकर, आप्पा पालकर तसेच विभागातील शिवसेना पदाधिकारी व ग्रामस्थ मंडळी यांची उपस्थिती होती. सर्व मान्यवर उपस्थितांचे समवेत आमदार महेंद्र दळवी यांनी श्रीफळ वाढवून तसेच फित कापून १०० के.व्ही. ट्रान्सफॉर्मर, वावे नवीन वसाहत कॉंक्रिट रस्ता, श्री राम चौक सुशोभिकरण, वावे येथील छोटा साकव तसेच सागवाडी येथील कालकाई मंदिर सुशोभिकरण व स्वागत कमान कामाचे लोकार्पण केले.

यानिमित्ताने सागवाडी येथील कालकाई देवी मंदिर येथे मान्यवर उपस्थितांचे स्वागत व सन्मान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तत्पूर्वी आमदार दळवी व उपस्थित मान्यवर मंडळी यांनी कालकाई देवीचे पूजाअर्चा करून दर्शन घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन जयवंत थळे यांनी केले.

# रायगड जिल्ह्यातून चारा वाहतूक आणि विक्रीवर बंदी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

खरीप हंगाम २०२६मध्ये रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यात 'ट्रिगर-१' (प्रथम कळ) व 'ट्रिगर-२' नुसार दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध राहावा आणि संभाव्य चारा टंचाई टाळता यावी, यासाठी रायगड जिल्ह्याच्या महसुली हद्दीतून इतर जिल्ह्यांत तसेच राज्याबाहेर सर्व प्रकारच्या ओल्या व सुक्या चाऱ्याची वाहतूक व विक्री करण्यास बंदी घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष किशन जावळे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३च्या कलम १६३ अन्वये हे आदेश जारी केले आहेत. जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, रायगड यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात उत्पादित होणारा चारा मोठ्या प्रमाणावर इतर जिल्ह्यांत विक्रीसाठी पाठविला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यात जिल्ह्यात चारा टंचाई निर्माण होऊन पशुधनाच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. तसेच चारा उपलब्धतेवरून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्‌भवण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने हा प्रतिबंधात्मक निर्णय घेतला आहे.

# पेणमध्ये कोंबडपाडावासिनीचा नवरात्रोत्सव भक्तिमय वातावरणात

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरातील गणेश मित्र मंडळ, कोंबडपाडा यांच्या वतीने दरवर्षी मोठ्या भक्तिभावाने साजरा होणारा नवरात्रोत्सव यंदा अधिक उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात सुरू झाला आहे.

यंदा देवीच्या स्थापना पूजेचे पूजन व पहिली आरती श्री. व सौ. कुणाल बिराजदार यांच्या हस्ते पार पडली. भक्तांच्या हाकेला धावून येणारी आणि नवसाला पावणारी आई कोंबडपाडावासिनी या उत्सवाचे मुख्य आकर्षण असून शहर व तालुक्यातील हजारो भाविक दर्शनासाठी गर्दी करत आहेत. मंडळाच्या या उत्सवाने यंदा ३६व्या वर्षात पदार्पण केले असून आठ फूट उंच भव्य मूर्ती लक्ष वेधून घेत आहे. मूर्तीचे आकर्षक रंगकाम व सजावट सिद्धार्थ राठोड, समीर बाकडे आणि बंटी पोहेकर मृगंज कुंभार यांनी केली आहे.



नऊ दिवस सकाळी ७ वाजता व सायंकाळी ८ वाजता आरती होणार आहे. यासोबत आरती, भजन, हळदी-कुंकू समारंभ, महाआरती, दांडिया, लहान मुलांसाठी भोंडला, फनी गेम्स, होम मिनिस्टर व फॅन्सी ड्रेस स्पर्धा अशा उपक्रमांचे आयोजन आहे. नवव्या माळेला होम व दसऱ्याच्या दिवशी सत्यनारायणाची महापूजा होणार आहे. विसर्जनाच्या दिवशी मंडळातर्फे भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

उत्सवासाठी अध्यक्ष प्रकाश शिंगरुत, अतुल पाटील, रवींद्र बांधणकर, अरविंद आंबोलकर, मंगेश नाईक, संतोष भोसले, महेश नाईक, दीपक पवार, भाऊ पवार, माजी नगराध्यक्ष गुरुनाथ मांजरेकर, रविंद्र विचारे,गजानन शिवरकर आनंद पवार, राजन पावले, किरण गुरव, गणेश पवार, सचिन शिंगरुत,राजेश कोठेकर कुणाल बिराजदार, भूपेंद्र बांधणकर, निखिल वेदक, दर्शन झेमसे, दिनेश विचारे, ऋषभ पावले, पवन म्हात्रे, मंदार म्हात्रे, तन्मय डापसे, मंगेश वाडकर, निलेश गुजर, सारंग पवार, प्रथमेश म्हात्रे, रुषिकेश बांधणकर, रोनिक झेमसे यांनी पुढाकार घेतला आहे. महिला मंडळ अध्यक्षा स्मिता गुरव, विशाखा नाईक, भावना बांधणकर, सोनाली पवार, जयवंती पवार यांच्यासह कोंबडपाडा आळीतील महिला मंडळाचा सक्रिय सहभाग आहे. सजावट व साऊंड सिस्टीमची जबाबदारी प्रगती डेकोरेटर्स, कृष्णा पाटील-रोडे यांनी सांभाळली आहे.

# माणगाव युवासेना महिला अध्यक्षपदी विनया ढेपे

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका युवासेना महिला अध्यक्षपदी येथील विवा कॉलेजच्या चेअरमन विनया विवेक ढेपे यांची नियुक्ती पक्षाच्या रायगड जिल्हा महिला प्रमुख नीलिमा घोसाळकर यांनी केली आहे. याबद्दल राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी विनया यांचे पती विवेक ढेपे हेही उपस्थित होते.

आपल्या या नियुक्तीबद्दल विनया ढेपे म्हणाल्या की, सर्वप्रथम मी पक्षश्रेष्ठींचे मनापासून ऋण व आभार व्यक्त करते. पक्ष नेतृत्वाने टाकलेली जबाबदारी मी समर्थपणे पेलून युवक-युवतींना सोबत घेऊन पक्ष संघटन अधिकतम मजबूत करून सामाजिक, शैक्षणिक, क्रीडाविषयक उपक्रम राबविण्याचा प्रयत्न करेन.



# अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दिव्यांगांसाठी पुनर्वसन सेवा सुरू

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील दिव्यांग रुग्णांना पुनर्वसनविषयक तज्ज्ञ सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग येथे ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ फिजिकल मेडिसिन अँड रिहॅबिलिटेशन (AIIPMR), मुंबई यांच्या सहकार्याने पुनर्वसन सेवा सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमाचा उद्‌घाटन कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.

या कार्यक्रमाला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबागच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील, AIIPMR मुंबईचे संचालक डॉ. चंद्रशेखर टाकळीकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी, सहयोगी प्राध्यापक डॉ. विकास क्षीरसागर, डॉ. सुधारक बंटेवाड, डॉ. कृष्णा बडगिरे, अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. फुसनाके तसेच AIIPMR मुंबई येथील डॉ. म्हामारे उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत AIIPMR मुंबई येथील फिजिओथेरपिस्ट आणि ऑक्युपेशनल थेरपिस्ट यांची तज्ज्ञ टीम दर महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग येथे भेट देणार आहे. यावेळी अस्थिरोग विभागाच्या बाह्यरुग्ण विभागात (ओपीडी) रुग्णांची तपासणी करून त्यांच्या गरजेनुसार पुनर्वसनविषयक मार्गदर्शन व उपचार करण्यात येतील. आवश्यकतेनुसार रुग्णांना संबंधित संस्थेमार्फत पुढील पुनर्वसन उपचारांसाठीही मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे. या सेवेमुळे अलिबागसह रायगड जिल्ह्यातील गरजू दिव्यांग व्यक्तींना तज्ज्ञ पुनर्वसन सेवा मिळण्यास मदत होणार आहे. रुग्णांची शारीरिक कार्यक्षमता सुधारणे, दैनंदिन जीवनातील स्वावलंबन वाढविणे आणि त्यांचे जीवनमान उंचावणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग आणि AIIPMR, मुंबई यांच्या समन्वयातून या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या सहकार्यामुळे दिव्यांग रुग्णांना पुनर्वसनविषयक उपचारांसाठी अधिक सुलभ सुविधा उपलब्ध होणार आहेत.

रायगड जिल्ह्यातील गरजू दिव्यांग रुग्णांनी या पुनर्वसन सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# हाँगकाँग सिक्सर्स स्पर्धेसाठी आता कृणालकडे भारताची धुरा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

हाँगकाँग सिक्सर्स क्रिकेट स्पर्धेबाबत एक मोठी आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. आगामी ३० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या या रोमांचक स्पर्धेत अष्टपैलू खेळाडू कृणाल पांड्या भारतीय संघाचे कर्णधारपद भूषवणार आहे. आयपीएलचा दांडगा अनुभव असलेल्या तडाखेबंद खेळाडूंचा समावेश असलेला हा संघ या वेगवान फॉरमॅटमध्ये भारताला विजय मिळवून देण्यासाठी सज्ज झाला आहे.



या स्पर्धेच्या सुरुवातीला भुवनेश्वर कुमार भारतीय संघाचे नेतृत्व करणार असल्याची चर्चा होती, मात्र न्यूझीलंड दौऱ्यासाठी भारताच्या टी-२० संघात निवड झाल्यामुळे त्याला हाँगकाँग सिक्सर्समधून माघार घ्यावी लागली आहे. तब्बल चार वर्षांच्या मोठ्या प्रतीक्षेनंतर राष्ट्रीय संघात पुनरागमन करणाऱ्या भुवीसाठी ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. २२ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या या दौऱ्यामुळे तो या वेगवान स्पर्धेला मुकणार आहे.

क्रिकेट हाँगकाँग, चीनचे वाणिज्य आणि विपणन संचालक अनुराग भटनागर यांनी यावर प्रतिक्रिया देताना म्हटले की, "हाँगकाँग सिक्सेस स्पर्धेत भुवनेश्वर कुमारची उणीव निश्चितच भासेल, परंतु चार वर्षांनंतर त्याचे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन होत असल्याचा आम्हाला आनंद आहे. आम्ही त्याला न्यूझीलंड दौऱ्यासाठी आणि भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा देतो."

भुवनेश्वर कुमारच्या अनुपस्थितीत आता कृणाल पांड्याकडे कर्णधारपदाची धुरा सोपवण्यात आली असून संघाची भिस्त आता पूर्णपणे आयपीएल गाजवलेल्या खेळाडूंवर असेल.

भारतीय संघ : कृणाल पांड्या (कर्णधार), शशांक सिंग, राहुल तेवतिया, नितीश राणा, राहुल त्रिपाठी, टी. नटराजन आणि कुलवंत खेजरोलिया.

## स्मृती मानधनाच्या नेतृत्वाखाली भारताची विजयी सलामी

**रायपूर : वृत्तसंस्था**

भारताच्या महिला क्रिकेट संघाने स्मृती मानधनाच्या नेतृत्वाखाली झिम्बाब्वेविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात चार विकेट्सने विजय मिळवत मालिकेची विजयी सुरुवात केली. पूर्णवेळ कर्णधार म्हणून स्मृती मानधनाच्या नव्या पर्वाची सुरुवात या सामन्याने झाली.

नाणेफेक हरल्यावर प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेच्या संघाने २० षटकांत पाच गडी गमावून ११४ धावा केल्या होत्या. भारतीय महिला संघाने हे लक्ष्य अवघ्या १५.४ षटकांत सहा विकेट्स गमावून पूर्ण केले. पहिल्या सामन्यातील विजयासह भारतीय संघाने मालिकेत आघाडी मिळवली आहे.



## जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत सीकेटी कॉलेजचा संघ उपविजेता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या सहकार्याने पनवेल महानगरपालिका जिल्हास्तरीय अंडर-१९ क्रिकेट स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील १९ वर्षाखालील मुलांचा संघ उपविजेता ठरला.

या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील, माधवी कोळी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपविजेत्या संघाचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## न्यूझीलंड दौऱ्यासाठी टीम इंडियात मोठे बदल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

न्यूझीलंड दौऱ्यासाठी भारतीय क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली आहे. या दौऱ्यात भारत आणि न्यूझीलंड यांच्यात पाच एकदिवसीय सामने आणि दोन कसोटी सामने खेळवले जाणार आहेत. एकदिवसीय मालिकेतील पहिल्या तीन सामन्यांत शुभमन गिल कर्णधार असेल, तर श्रेयस अय्यरकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. अखेरच्या दोन एकदिवसीय सामन्यांसाठी श्रेयस कर्णधार आणि ईशान किशन उपकर्णधार असेल. दुसरीकडे कसोटी मालिकेत गिल कर्णधार असून केएल राहुलकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी असेल.

न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतील पहिल्या तीन सामन्यांसाठी शुभमन गिल कर्णधार असणार आहे. श्रेयस अय्यरकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. एकदिवसीय मालिकेतील अखेरच्या दोन सामन्यांसाठी भारतीय संघाच्या नेतृत्वात बदल करण्यात आला आहे. या सामन्यांत श्रेयस कर्णधारपद सांभाळणार असून ईशान किशनकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. या संघात रोहित शर्मा आणि विराट कोहली या अनुभवी फलंदाजांना कायम ठेवण्यात आले आहे तसेच तिलक वर्मालाही संधी देण्यात आली आहे.

या दोन सामन्यांसाठी कुमार कुशाग्रची निवड करण्यात आली आहे. त्याच्यासोबत आकिब नबी आणि यश ठाकूर यांनाही संघात स्थान देण्यात आले आहे. पहिल्या तीन सामन्यांच्या संघात असलेला केएल राहुल अखेरच्या दोन सामन्यात नसेल. त्याऐवजी ईशान किशन आणि कुमार कुशाग्र या दोघांचा समावेश असेल.

## राज्य शालेय कुस्ती स्पर्धेत रायगडची चमक

### तिघींनी जिंकली पदके

**चौक : प्रतिनिधी**

पंढरपूर येथे राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत खोपोलीतील क्षितिजा जगदीश मरागजे हिने दिमाखदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकाविले. याच स्पर्धेतील प्रणाली घनवट हिच्या रौप्यपदकाने आणि ऋतुजा रुपनवर हिच्या कांस्यपदकाने रायगड कुस्तीविश्वाच्या यशात आणखी भर घातली आहे.

क्षितिजा ही प.पू. गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूलमध्ये अकरावीच्या वर्गात शिक्षण घेत आहे. शिक्षणासोबत कुस्तीच्या मैदानातही आपले कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या क्षितिजाने प्रतिस्पर्धी मल्लावर १०-० अशी एकतर्फी मात करत सुवर्णपदक पटकावले. राज्यस्तरीय स्पर्धेतील तिचे हे चौथे सुवर्णपदक ठरले आहे.





कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती संकुलाची खेळाडू असलेल्या क्षितिजाला संकुलाचे अध्यक्ष तथा कुस्ती प्रशिक्षक राजाराम कुंभार, विजय चव्हाण आणि दिवेश पालांडे यांचे मार्गदर्शन लाभत आहे तसेच राज्यस्तरीय कुस्ती प्रशिक्षक संदीप वांजळे यांच्या प्रशिक्षणामुळे तिच्या खेळाला अधिक धार मिळत आहे.

राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत प्रणाली घनवट हिने रौप्यपदक जिंकले, तर ऋतुजा रुपनवरने कांस्यपदक मिळविले. क्षितिजा, प्रणाली आणि ऋतुजा यांच्या यशाबद्दल रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष परेश ठाकूर, खालापूर तालुक्याचे तहसीलदार अभय चव्हाण, खोपोली नगरपालिकेचे नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, खोपोली पोलीस ठाण्याचे निरीक्षक सचिन हिरे, खालापूर तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष सुनील पाटील, प. पू. गगनगिरी इंटरनॅशनल स्कूलचे मुख्याध्यापक गौरव तिवारी आदींनी अभिनंदन केले.

## दिल्ली कॅपिटल्सच्या गोलंदाजी कोचपदी चामिंडा वास

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



आयपीएल २०२७साठी दिल्ली कॅपिटल्सने श्रीलंकेचा माजी दिग्गज गोलंदाज चामिंडा वास यांची गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. सौरव गांगुली आणि युवराज सिंग यांच्यानंतर आता वास यांच्या येण्याने दिल्ली संघाची ताकद कैक पटींनी वाढली आहे.

चमिंडा वास हे श्रीलंकेच्या क्रिकेट इतिहासातील सर्वाधिक प्रभावी वेगवान गोलंदाजांपैकी एक मानले जातात. १९९६मध्ये श्रीलंकेने पहिल्यांदा एकदिवसीय विश्वचषक जिंकला, त्या ऐतिहासिक संघात वास यांचा समावेश होता. खेळाडू म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवल्यानंतर त्यांनी प्रशिक्षक म्हणूनही आपली कारकीर्द पुढे नेली. त्यामुळे त्यांच्या अनुभवाचा फायदा दिल्लीच्या गोलंदाजांना मिळण्याची अपेक्षा आहे.

### हेड कोच जयवर्धने मुंबई संघातून पायउतार

**मुंबई :** नव्या हंगामापूर्वी मुंबई इंडियन्स संघात एक मोठा बदल पाहायला मिळाला आहे. श्रीलंकेचे माजी कर्णधार आणि दिग्गज क्रिकेटपटू महेला जयवर्धने यांनी मुंबईच्या मुख्य प्रशिक्षक पदावरून पायउतार होण्याचा निर्णय घेतला आहे. जयवर्धने यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने तीन वेळा आयपीएल विजेतेपद पटकावले होते, मात्र गेल्या वर्षी संघ बिकट परिस्थितीत दिसून आला. त्यामुळे १० वर्षांच्या प्रदीर्घ सहवासानंतर मुंबई इंडियन्स आणि जयवर्धने यांचे मार्ग वेगळे झाले आहेत.




### झंकार नवरात्रोत्सव



**पनवेल : येथील सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने मिडलक्लास हौसिंग सोसायटीमध्ये आयोजित झंकार नवरात्रोत्सवाच्या सहाव्या दिवशी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिका सभापती अजय बहिरा, डॉ. रमेश पटेल, गीता नितीन पाटील, संजय जैन, माजी नगरसेवक किरण मनोरे, राहुल कौल, सचिन चिखलेकर, रूपेश नागवेकर, पवन सोनी, राजीव मोहात, विनोद बाफना, अकिल जैन, स्वाती कोळी, नीता झुंजारराव, मेधा कुलकर्णी, गीता शेट्टी, जागृती झुंजारराव, ज्योती झुंजारराव आदी उपस्थित होते. वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या महिलांचा यावेळी सत्कार करण्यात आला तसेच दांडिया स्पर्धेत उत्कृष्ट गरबा सादर करणाऱ्या स्पर्धकांसह बालकलाकारांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.**












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com